अहम् आवाम्

वर्ष बारावे | अंक १० | एप्रिल २०२५ | पृष्ठे ५२

# वयम्

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

मूल्य ₹१०/-






**मिनूच्या टोपलीत किती खेळणी आहेत बघा!**
**तुमच्या अगदी लहनपणापासून आजपर्यंतची तुमची आवडती खेळणी कोणती?**
**आठवून यादी करा, मजा येईल.**

RNI NO.MAHMUL/2013/53138

कल्पक, चौकस किशोरांचे मासिक

अहम् आवाम्

वयम्

वर्ष १२ | अंक १० | एप्रिल २०२५

चैत्र / वैशाख शके १९४७

**प्रकाशक**
श्रीकांत बापट

**सल्लागार**
डॉ. अनिल काकोडकर
कुमार केतकर
डॉ. आनंद नाडकर्णी
डॉ. उदय निरगुडकर
राजीव तांबे

**मुख्य संपादक**
शुभदा चौकर
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

**मुखपृष्ठ**
भाग्यश्री पटवर्धन

**सुलेखन**
अच्युत पालव

**अंकातील चित्रे**
गिरीश सहस्त्रबुद्धे, संतोष घोंगडे, अदिती पाध्ये-देसाई, वैष्णवी माहीमकर

**वरिष्ठ उपसंपादक**
क्रांती गोडबोले-पाटील

**मांडणी-सजावट**
क्रांती गोडबोले-पाटील

**मुद्रितशोधन**
शिवानी ओक

**वितरण व्यवस्था**
राजेंद्र गोसावी

'वयम्' हे मासिक मालक, प्रकाशक श्रीकांत बापट यांनी मेसर्स रेड एलिफंट, ३१५/ए १, शाह ॲण्ड नाहर इंड. इस्टेट, ३रा मजला, एस. जे. मार्ग, लोअर परेल (प.) मुंबई- ४०००१३, येथे छापून, २०१, नंद चेंबर्स, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२ येथे प्रसिद्ध केले. या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

**संपादकीय विभाग :**
'वयम्', न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
इमेल : info@wayam.in

www.wayam.in

# अंतरंग




- संपादकीय : शुभदा चौकर- ४
- फुलपाखरू : डॉ. प्रसन्न दाभोलकर- ६
- अंतराळातले नऊ महिने! : श्रीराम शिधये- १०
- किती रंग किती आकार : डॉ. संगीता बर्वे- १३
- स्कीन फ्रेंडली कपडे : राजीव तांबे-१४
- वीरकथा : राणी रासमणी- मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी- १८
- Witty Talks -Prachi Mokashi- २१
- रशियाची सुरस सफर !- सावनी गोडबोले- २२
- Hide & Seek : Mahimkar Sisters- २६
- फ्लो-प्रेरणा देणारा सिनेमा : गणेश मतकरी- २८
- कल्पककला : स्वरूपा वक्नाली- २९
- खाऊपिऊची सवारी : मकरंद जोशी- ३०
- मनोविकास- मन की बात! : वैदेही भिडे- ३२
- स्वत:शीच लढा- चिन्मय मांडलेकर- जयश्री देसाई- ३४
- A Fan Moment : Prachi Mokashi- ३६
- 'आइसक्रीम क्वीन'शी गप्पा- आकांक्षा बापट : कांचन जोशी- ४०
- गुपित फुलांच्या रंगांचं, गंधांचं- डॉ. श्रीश क्षीरसागर- ४२
- वसंत ऋतू-फोटोग्राफी स्पर्धा- ४७
- रंगतरंग- डॉ. हर्षदा देवधर- ४८
- शब्दाशब्दी / फरक शोधा- कांचन जोशी, अथर्व आगरकर- १२ / ४८


महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

'वयम्' वाचकांनो, दर महिन्याला २० तारखेपर्यंत तुम्हांला अंक पोहोचला नाही तर 'वयम्'च्या दूरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात संपर्क साधावा, ही विनंती. -**संपादकीय आणि वितरण विभाग**

## संपादकीय

# हम चलेंगे साथ साथ




पहिला अंक

**'वयम्' दोस्तांनो,**

या महिन्यात आपलं 'वयम्' मासिक १२ वर्षांचं होत आहे. एक तप झालं 'वयम्' सुरू होऊन. 'वयम्'चा प्रत्येक अंक म्हणजे एकेक प्रयोग असतो. एकेक अनुभव असतो आमच्यासाठी. तुम्हा मुलांच्या जिज्ञासेला, कल्पकतेला, संवेदनशीलतेला आणि अपेक्षेला अनुसरून अंक घडवायचा, हे आव्हान असतं. तुमच्यासाठी हे काम करता करता आम्हा सर्वांमध्ये दडलेलं मूल आम्हांला साद घालत असतं.

म्हणजे बघा हं, अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि विलमोर हे दोघं एक आठवड्यासाठी अंतराळ स्थानकावर गेले आणि त्यांना नऊ महिने तिथेच राहावं लागलं. कसा होता हा काळ, कसा असायचा त्यांचा दिवस, असे प्रश्न आपल्याला पडतात. मग आम्ही या विषयातल्या तज्ज्ञांना गाठतो आणि विनंती करतो आपल्यासाठी लिहिण्याची. चिमुकल्या चतुर कीटकांचे थवे दरवर्षी भारत ते पूर्व आफ्रिका परतीचा प्रवास करतात, मग अशा एका संशोधनावरची बातमी वाचून त्याबद्दल नवल वाटलं आणि आपल्या निसर्ग अभ्यासक मित्राने त्यावर लिहिलं. तुमच्या कुतूहलभरल्या मनासाठी असं साहित्य निर्माण करताना आम्हांलाही आनंद होतो.

लहानपणी आपण जेवढ्या वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी वाचू, तितक्या प्रकारच्या कल्पना, भावभावना, नाती आपल्याला कळतात. त्यामुळे आपल्या प्रत्येक अंकात गोष्टींचं वैविध्य असतं. वीरकथा, लोककथा, संवेदनशील गोष्टी, नीतिकथा, कुतूहल-कथा, नात्यांच्या गोष्टी तुमच्यासाठी लिहिणाऱ्या साहित्यिकांची टीम आपल्याकडे आहे.

सण, उत्सव, ऋतू, विशेष दिन अशा निमित्तांनी आपण त्या त्या विषयाचे पैलू उलगडून दाखवण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येक विषयाला विविध कंगोरे असतात. रंगपंचमी हे एक निमित्त मानले तर आत्तापर्यंत आपण रंगांचे अनेक पैलू सादर केले आहेत. मुळात आपल्या डोळ्यांना वेगवेगळे रंग कसे काय दिसतात, झाडा-फुला-पानांना वेगवेगळे रंग कसे प्राप्त होतात, निसर्गातले रंग ऋतूनुसार का

बदलतात... माहितीच्या पलीकडे जाऊन ह्या प्रश्नांमागचे तर्क, विज्ञान गमतीदार पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न आपण करत असतो. आपली काही शीर्षकं बघा- ‘फुलांना जेव्हा ताप येतो!’, ‘फुलांना रंगवतं तरी कोण?’, ‘ढगॉलॉजी’!

अधूनमधून तुमच्यातले काही वाचक आपल्याकडे लिहितातही. आपण विचारस्पर्धा, फोटो+फोटो ओळ स्पर्धा, कथा-स्पर्धा घेतो आणि तुमच्यातल्या निवडकांचे साहित्य प्रसिद्ध करतो. तुमच्यातले कोणी काही चांगले उपक्रम करतात, त्यांच्या चांगल्या कामांना आपण प्रसिद्धी देतो. नाशिकच्या राधाने आणि तिच्या मैत्रिमैत्रिणींनी मिळून ‘कापडी पिशव्या’ हा प्रकल्प राबवला, त्यांचे अनुभव आपण अलीकडेच प्रसिद्ध केले. मिरज तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतल्या मुलींनी आणि त्यांच्या आयांनी एकमेकींना पत्र लिहून नात्यांचा पूल बांधण्याचा प्रयत्न कसा केला हा अनुभव, त्यांना अशी कल्पना सुचवणाऱ्या त्यांच्या कृष्णात पाटोळे सरांनी आपल्यासाठी लिहिला. ‘इस्रो’ला भेट देऊन आलेल्या लातूरच्या शाळांतील निवडक मुलांचे रोचक अनुभव आपण प्रसिद्ध केले होते. साने गुरुजी यांचं एक प्रसिद्ध पुस्तक आहे- ‘धडपडणारी मुले’. अशा धडपडणाऱ्या मुलांच्या आपण कायम शोधात असतो, कारण त्यांचे अनुभव आपल्याला प्रेरणा देतात, नवीन कल्पना सुचवतात.

या साहित्याला आकर्षक, समर्पक चित्रांचा, सजावटीचा, अच्युत पालव यांच्या सुलेखनाचा साज चढला की आपला अंक देखणा होतो. यांसाठी आपल्या टीममधले चित्रकार, आपली क्रांतीताई आणि आपले सर्व सहकारी झटत असतात. सजावटीला चांगल्या छपाईची जोड मिळाली की, प्रत्येक अंक सुंदर स्वरूपात पेश होतो. १२ वर्षांपूर्वी जेव्हा आपण ‘वयम्’ सुरू केलं तेव्हाच आपले प्रकाशक श्रीकांत बापट यांनी आम्हांला सांगितलं होतं की, मुलांना जे द्यायचं ते उत्तम हवंच! हा उत्तमतेचा ध्यास पूर्ण ‘वयम्’ कुटुंबाने कायम घेतलेला आहे. यापुढेही असंच उत्तम काम आपल्याला करायचं आहे. त्यात तुमचं सहकार्य महत्त्वाचं. तुम्ही वाचकांनी तुमचं मत, अनुभव, अपेक्षा कळवत राहा. तुमच्या मित्र-मैत्रिणींना ‘वयम्’चं सभासद होण्यासाठी सुचवत राहिलात तर अधिकाधिक वाचक आपल्याशी जोडले जातील. यासाठी तुमची साथ मोलाची!

ज्ञान, कल्पकता, विचार, संवेदना, नीतिमत्ता या सगळ्या बाबतीत आपली क्षमता वाढवून तुम्हांला भविष्यासाठी तयार व्हायचंय. या तुमच्या तयारीत वाचन हे एक महत्त्वाचं साधन. वाचनाच्या प्रांगणात तुम्ही राहावं, यासाठी ‘वयम्’ टीम खारीचा वाटा उचलत आहे. ‘वाचनातून विचार आणि विचारातून विकास’ हे आपलं ब्रीदवाक्य तुमच्या बाबतीत खरं होईल याची खात्री आहे. ‘वयम्’वाचत मोठी झालेली काही मुलं आज त्यांच्या आवडीच्या वाटेवर प्रगती करत असल्याचं कळवतात, तेव्हा आनंद होतो.

‘वयम्’ सुरू होतानाच कवी मिलिंद जोशी यांनी आपल्यासाठी ‘वयम्’ गीत रचलं होतं. त्यात त्यांनी, डिजिटल युगातही स्क्रीनच्या पलीकडे खूप काही असतं, त्याचा शोध घेण्याचं आवाहन केलं होतं. प्रत्यक्ष वाचनानंदात तुम्ही रमावं, हा ध्यास आम्ही घेतला आहे. दिवसेंदिवस वाचणाऱ्यांचे प्रमाण कमी होत असताना हा प्रवास अवघड होतोय खरा, तरीही तो सुंदर आहे, आवश्यक आहे. ‘हम चलेंगे साथ साथ, डाल हाथोंमें हाथ’ असा प्रवास आपण अधिक दमदारपणे करत राहू या!

**-शुभदा चौकर**
*cshubhada@gmail.com*

**पन्नाशीला** पोचलेल्या उषाताईंना अशा प्रसंगांचे नावीन्य उरले नव्हते. नेहमीप्रमाणे त्या दिवशी संध्याकाळी त्या लगबगीने घरी निघाल्या होत्या. अनेकदा वाटेत त्यांना त्यांचा एखादा माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी भेटायची. आवर्जून त्यांना थांबवून, आदराने नमस्कार करून स्वतःची ओळख करून द्यायची. एकेकाळी लहान असणाऱ्या त्या मुला-मुलींना प्रौढरूपात ओळखणे शक्यच नसायचे. मात्र त्या मुलामुलींच्या मनावर त्यांची ओळख पक्की कोरलेली असायची.

उषाताईंची शाळा एका नामवंत संस्थेची होती. गरीब वस्तीत होती. सरकारी रिमांड होममधील काही अनाथ मुलंदेखील त्यांच्या शाळेत येत असत. ही मुलं प्रेमाला आसुसलेली असायची. उषाताई स्वतः हालातून आणि कष्टातून वर आल्यामुळे त्यांना या मुलांचं मन कळायचं.

# फुलपाखरू

*चित्रं- अदिती पाध्ये-देसाई*



तरीही त्या दिवशी संध्याकाळी घडलं ते विलक्षणच. भर रस्त्यात स्वच्छ कपडे घातलेल्या एका तरुणाने त्यांना चक्क साष्टांग नमस्कार घातला. आपले कपडे मळत आहेत, याची त्याला जाणीवही नव्हती. न लाजता तो सर्वांसमोर अश्रू ढाळत होता.

"अहो हे काय करता?" असं म्हणत उषाताई थबकून उभ्या राहिल्या- "मी तुम्हांला ओळखलं नाही."

"ताई, तुम्ही मला कशा ओळखाल? आणि मी तुम्हांला कसा विसरेन? मी छोटू. तुमचं फुलपाखरू!" भरल्या गळ्याने बोलत त्याने उषाताईंचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले.

"अरे तू? तुला कशी विसरेन? पण तेव्हा तू खराच छोटू होतास, आता मोठा बाप्या बनला आहेस." स्वतःला सावरत उषाताई म्हणाल्या.

साधारण वीस वर्षांपूर्वीचा काळ त्यांच्या नजरेसमोरून झरझर निघून गेला.

...छोटू तिसरीत होता. रिमांड होममधील अनाथ मुलगा. एक तर ही मुलं बुजरी आणि एकेकटी असायची किंवा दंगेखोर आणि जरा आक्रमक. चार गोड शब्द बोललं, प्रेमाने त्यांच्याकडे लक्ष दिलं, काही चांगलं केल्यावर मनापासून दाद दिली आणि अयोग्य वागण्यास दटावून नापसंती दाखवली की हळूहळू ती मुलं त्यांच्याजवळ येत. प्रेम तर द्यायचं, परंतु लाडावायचं नाही, तर मुलांचा स्वतःवरील विश्वास वाढवायचा प्रयत्न करायचा या साध्या तत्त्वांवर त्यांनी अनेक मुलांना छान वळण लावलं होतं.

छोटूला बघितल्यावरच त्यांच्या लक्षात आलं की, हा मुलगा अगदी एकटा आहे. जगाकडे पाठ करून स्वतःमध्येच गुरफटलेला. छोट्या चणीचा, अबोल, लाजाळू. बसायचादेखील तो वर्गातील कोपऱ्यातल्या बाकावर एकटाच. वर्गात तो कधीच त्रास द्यायचा नाही, वर्गात काय चाललं आहे याकडे त्याचं तिळमात्र लक्ष नसायचं. त्याचं पुस्तक दिवसभर बंदच राहायचं. वह्या कोऱ्या असायच्या. क्वचित कधीतरी रेघोट्या दिसायच्या. तो मुलांबरोबर गाणी आणि पाढे म्हणायचा नाही. कधी काही विचारलं तर खाली मान घालून उभा राहायचा, परंतु तोंडातून चकार शब्द निघायचा नाही. शाळेतला मध्यान्ह आहार भरपूर खायचा, त्यावेळीही इतर मुलांबरोबर तो मिसळत नसे. सुट्टीच्या वेळी, मैदानावर कायम एकटाच असे.

उषाताईंनी सुरुवातीला सोपी तंत्रं वापरली. छोटूला पुढे बसवून बघितलं. वर्गातून फेऱ्या मारताना त्याच्याकडे नजर टाकून त्या प्रेमाने हसायच्या. क्वचित डोक्यावर मायेने हात ठेवायच्या. हे वाच, ते लिही असं वेळोवेळी सुचवायच्या. परंतु छोटूवर कशाचाच काहीही परिणाम झाला नाही. त्याने जणू स्वतःभोवती एक कवच उभं केलं होतं. ते कवच भेदून त्या लहानग्या जीवापर्यंत पोचायचंच, अशी जिद्द बाळगून त्या प्रयत्नाला लागल्या. स्वतःशी विचार करून, वाचून, ज्येष्ठ शिक्षकांशी बोलून त्यांनी विविध मार्ग हाताळले.

वर्गातील एका बडबड्या, आनंदी मुलाला त्याच्या शेजारी बसवून बघितलं. फळा पुसणं, ऑफिसमधून खडू आणणं अशी मुलांना मानाची वाटणारी कामं त्या छोटूला सांगू लागल्या. मैदानावर जाताना एका रांगेच्या सुरुवातीला त्या त्याला उभा करीत. वर्गात कविता म्हणून घेताना इतर चार मुलांबरोबर त्यालाही समोर उभं करीत. जेवणाच्या वेळी मुलांना वाढताना आपल्याला मदतनीस म्हणून घेत. परंतु छोटूचा गंभीर एकाकी भाव तसाच राहिला.

आणि एके दिवशी विलक्षण जादू घडली. नुकताच पावसाळा संपला होता. सोनेरी ऊन सगळीकडे पसरलं होतं. अचानक दोन फुलपाखरं वर्गात शिरली. इकडे तिकडे भिरभिरू लागली. तिसरीतली मुलं ती. त्यांचं लक्ष फुलपाखरांबरोबर चौफेर उडू लागलं. परंतु छोटू तसाच खाली मान घालून, स्थिर नजरेने



बाकाकडे बघत होता. फुलपाखरांना काय वाटलं कोणास ठाऊक. कदाचित छोटू शांत बसला असल्यामुळे की काय, ती त्याच्या खांद्यावर जाऊन बसली. छोटू तसाच स्तब्ध राहिला.

उषाताईंच्या मनात अचानक एक कल्पना चमकून गेली. त्यांनी शिपाईकाकांना बोलावलं आणि फुलपाखरांचा तक्ता मागवून घेतला. उषाताईंनी मुलांना फुलपाखरांची अंडी, सुरवंट आणि कोश यांची चित्रं दाखवली. अंडी कोणीच बघितली नव्हती. सुरवंट अनेकांनी बघितले होते.

त्या म्हणाल्या, "आज आपल्याकडे पाहुणे आले आहेत. सुंदर, गोंडस, इवले पाहुणे. ही फुलपाखरं.. त्यांची गोष्ट आपण ऐकू या आणि त्यांनाही ऐकवू या. फुलपाखरांची अंडी तुम्ही बघितली देखील नसतील. अगदी छोटी असतात ती. पटकन कोणाला दिसणार नाहीत अशा प्रकारे एका कोपऱ्यात किंवा पानाच्या मागच्या बाजूला फुलपाखरू आपली अंडी घालतं. या अगदी बारीक अंड्यात एक अळी तयार होते. आता तिला ते अंधारं अंड आवडत नाही. अळीच्या मनात अंड्याच्या बाहेर येऊन जग बघायची इच्छा तयार होते. मग सतत ढुशा देऊन अळी कवच फोडते आणि बाहेर येते. बाहेर असतात हिरवीगार पानं आणि झाडं. फुलपाखराने अळीला पचतील आणि खाता येतील अशाच पानांवर आपली अंडी घातलेली असतात. हिरवीगार लुसलुशीत पानं म्हणजे अळीला मेजवानीच. अळी पटापट पानं फस्त करू लागते. मग अळी बनते गलेलठ्ठ. पक्ष्यांनी किंवा इतर कीटकांनी खाऊ नये म्हणून अळीच्या अंगावर काटे असतात आणि तिच्या काळयाकुट्ट लांबोडक्या शरीरावर मोठ्या भयानक डोळयांप्रमाणे दिसणारे ठिपके असतात. असा एक बलदंड सुरवंट तयार होतो. तुमच्यासारखी मुलं त्या बागेत खेळत असतात. त्या भीतिदायक सुरवंटाला बघून ती 'ई, ई' करत मागे सरकतात, पळून जातात. मुलं आपल्याला घाबरली हे बघून सुरवंटाला खूप वाईट वाटतं. तो झाडाच्या काटकीच्या मागे लटकून एकटाच उभा राहतो. सगळयांपासून दूर. तो कोणाशी बोलत नाही, हसत नाही, खेळत नाही. तो स्वतःभोवती कोश तयार करतो."

उषाताई पुढे समजावून सांगू लागल्या, "सुरवंट कोशात स्वतःला बंद करून घेतो. पण तो काही झोपलेला नसतो. कोशाच्या आत तो खूप काम करतो. तो ठरवतो, आता रूप पालटायचं. इतकं सुंदर बनायचं की सारं जग आपल्याकडे बघून आनंदी होईल. कोशामध्ये सुरवंटाचं हळूहळू फुलपाखरू बनतं. फुलपाखराची वाढ पूर्ण झाली की त्याला कोश म्हणजे कोंडवाडा वाटू लागतो. कोशाच्या एका टोकाला छेद घेऊन आणि खूप धडपड करून फुलपाखरू बाहेर येतं. आता त्याला पंख फुटलेले असतात. त्या पंखांवर रंगीबेरंगी आकार असतात. दोन टपोरे मोठे डोळे आणि दोन काळयाभोर, सुंदर लांब मिशा. मग पंख

पसरून ते उडू लागतं. लांब सोंडेने फुलांमध्ये दडलेला मध आनंदाने चोखतं. ते फुलांना मदतही करतं. एका फुलातील परागकणांचं दुसऱ्या फुलावर सिंचन करतं."

थोडं थांबून ताईंनी वर्गातील मुलांना विचारलं, "तुमच्यापैकी कोणाकोणाला फुलपाखरू बनायचं आहे?"

सगळी मुलं "मला, मला" म्हणून उड्या मारू लागली.

अचानक छोटूही उठला. "मी होणार फुलपाखरू!" असं हसत हसत म्हणत तो त्याचे हात फुलपाखरासारखे हलवू लागला. छोटू त्या फुलपाखरांच्या मागे धावू लागला. अचानक उत्साहाने भरलेल्या छोटूला बघून मुलंही छोटूभोवती फेर धरून नाचू लागली.

वर्गातील दंगा थांबवायचे भान उषाताईंना राहिले नाही. छोटू इतर मुलांबरोबर हसत होता, पळत होता, फुलपाखरांच्या मागे धावत होता.

छोटूमध्ये घडलेलं परिवर्तन अत्यंत आश्चर्यकारक होतं खरं. परंतु ते अचानक झालं असं तरी कसं म्हणावं? उषाताईंनी गेले कित्येक महिने त्याच्याजवळ जाण्याचा सातत्याने प्रयत्न केला होता. त्यातील काहीतरी माया त्याच्या मनात पोचली असेल. त्यामुळे त्याच्या मनाला हळूहळू उभारी आली असेल.

छोटूसाठी आणखी काय करावं आणि करू नये असं त्यांना झालं. मोठ्या बाई म्हणाल्या, "उषाताई, खूप छान. आता त्याला त्याच्या गतीने मोकळं होऊ दे, मुलांमध्ये मिसळू दे, अभ्यासात रस घेऊ दे. तुम्हांला माहीत आहे ना, फुलपाखरू कोशातून बाहेर येत असताना खूप तडफडतं. अशा वेळी कोश कापून त्याला बाहेर यायला कुणीच मदत करायची नसते. खूप प्रयत्नांनी छोट्याशा भोकातून ते बाहेर येत असतं. त्यावेळी त्याच्या पोटातील रस त्याच्या पंखांतील नलिकांमध्ये पसरतो आणि त्यामुळे त्याचे पंख उडायला सक्षम बनतात. फुलपाखरावर दया दाखवून आपण त्याला कोशातून बाहेर काढले तर ते उडू शकत नाही. तुम्ही छोटूवर लक्ष ठेवा. त्याला नेहमीप्रमाणे प्रेम द्या. पण आता त्याच्या मागे लागू नका. त्याच्या गतीने तो नक्की वाढेल."

मोठ्या बाईंनी चौथीलाही उषाताईंना त्याच वर्गाची वर्गशिक्षिका नेमलं. उषाताई आणि छोटूची छान गट्टी जमली. छोटू त्याच्या गतीने वेगवेगळया गोष्टी शिकत होता. अधून मधून उषाताईंकडे लाजत बघत तो आपलं वागणं योग्य आहे ना, याचा अंदाज घेत होता. त्यांचं छोटेसे हसू किंवा पाठीवरून फिरलेला हात त्याला पुरेसा होता.

उषाताई मधून मधून त्याला विचाराच्या,"काय म्हणतंय माझं फुलपाखरू? मजेत आहे ना?" बस एवढंच!

चौथीनंतर तो मोठ्या शाळेत गेला. उषाताईंचा आणि छोटूचा संपर्क सुटला.

...आणि त्या दिवशी अचानक त्यांचं ते छोटं फुलपाखरू मोठं बनून त्यांच्यासमोर उभं होतं.

"ताई तुमच्यामुळे..." मोठ्या छोटूचा कंठ दाटून आला.

त्याच्याकडे बघत, किंचित हसत उषाताई म्हणाल्या, "अरे, मी तुला बळ दिलं असेल. परंतु त्याच्या बदल्यात मला किती समाधान आणि आनंद मिळाला, त्याचं मोजमाप करता येणार नाही."

**-डॉ. प्रसन्न दाभोलकर**
*prasannadabholkarpri@gmail.com*
*(मानसतज्ज्ञ)*



# अंतराळातले नऊ महिने !

**सुनीता विल्यम्स आणि विलमोर हे दोघंजण एक आठवड्यासाठी म्हणून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेले आणि त्यांना ९ महिने तिथेच राहावं लागलं. कसा होता तो काळ? काय काय केलं त्यांनी?**

**सुनीता** विल्यम्स आणि विलमोर हे दोघेजण आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातून पृथ्वीवर नुकतेच सुखरूप परतले आहेत. गेल्या वर्षीच्या जून महिन्यात हे दोघं एका आठवड्यासाठी म्हणून तिथे गेले होते. पण ते तिथं गेले आणि त्यांना परत घेऊन येणाऱ्या अवकाशयानात काही तांत्रिक प्रश्न निर्माण झाले. ते दूर करण्यासाठी ते यान पृथ्वीवर आणणं आवश्यक होतं. मात्र त्यातून अवकाशवीरांना घेऊन येणं धोक्याचं होतं. यामुळे हे दोघेजण तिथेच राहिले. अचानक आलेलं संकट म्हणजे नवीन काही करण्याची मिळालेली संधीच आहे, अशा विचाराने त्याकडे पाहिलं की, सगळ्याच गोष्टी सोप्या होऊन जातात. या दोघांनीही तसंच केलं. एक आठवड्यासाठी म्हणून गेलेल्या सुनीता यांच्या नावावर ३० नोव्हेंबर २०२४ या दिवशी एका विक्रमाची नोंद झाली. अंतराळातील अवकाश स्थानकात ५०० दिवस राहिल्याचा पराक्रम त्यांनी केला. ३० जानेवारी २०२५ या दिवशी सुनीता यांनी स्पेस वॉक केला. तो त्यांचा एकंदर नववा स्पेस वॉक होता. आतापर्यंत त्यांनी ६२ तासांहून अधिक काळ स्पेस वॉक केलं आहे! हा एक नवीन विक्रमच आहे.

'एक्सपिडिशन ७२'च्या कमांडर असलेल्या सुनीता आणि याच मोहिमेचे फ्लाइट इंजिनीअर असलेले विलमोर या दोघांनी तिथे विविध प्रयोग केले आहेत. या अवकाशवीरांना अंतराळात भाजीपाला वाढविण्याचा अनुभव मिळाला आहे. त्यासाठी स्थानकावर एक स्वतंत्र खोली उभारली आहे. डिसेंबर महिन्यात सुनीता यांनी रेड रोमेन लेट्युसची जास्त वाढलेली पानं कापली, असं 'नासा'नं जाहीर केलं. डिसेंबर महिन्यातच अलेक्सी आणि इव्हान या दोन अवकाशवीरांनी स्पेस वॉक केला. अवकाशात फेरफटका मारण्यासाठी त्या दोघांची तयारी, त्यावर बारकाईने लक्ष ठेवण्याचं अतिशय महत्त्वाचं काम सुनीता यांच्याकडेच होतं.

गमतीची गोष्ट म्हणजे विलमोर यांनी निक या दुसऱ्या अवकाशवीराच्या डोक्यावर वाढलेले केस कापले! कल्पना करा, गुरुत्त्वाकर्षण नसलेल्या

जागी केस कापणं किती कठीण असेल! त्यामुळेच केस कापण्याची कात्रीसुद्धा खास प्रकारची केलेली असते. त्या कात्रीलाच एक व्हॅक्युम बसवलेला असतो. कात्रीने केस कापला रे कापला की, दुसऱ्या क्षणी तो आपल्यात ओढून घेऊन त्याला बंदोबस्तात ठेवण्याचं काम हा व्हॅक्युम करतो!

गेल्या ४ डिसेंबर या दिवशी सुनीता यांनी अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्सच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांशी व्हिडिओवरून गप्पा मारल्या. त्या मुलामुलींनी त्यांना अनेकविध प्रश्न विचारले. त्यांना उत्तरं देताना त्या सांगत होत्या की, अवकाश स्थानकात हे अवकाशवीर एकमेकांचे वाढदिवस साजरे करतात. तिथे साठा केलेल्या बन, चॉकलेट, पुडिंग अशा गोष्टींचा उपयोग करून केक बनवला जातो. एका मुलाखतीत सुनीता यांनी सांगितले की, स्थानकावर आल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात त्यांना फार जेवण जात नव्हतं. नंतर त्या दररोज दणकून शारीरिक व्यायाम करू लागल्या. मग भूक लागून त्या व्यवस्थित जेवू लागल्या. तिथे त्या काय जेवतात तर, त्या म्हणाल्या होत्या, 'सकाळी मी लिंबूवगार्तल्या फळांची कोशिंबीर खाते. माझ्याकडे काही भारतीय खाद्यपदार्थही आहेत. कॅरेबियन चिकनही आहे. काही तयार पदार्थ आहेत, त्यात पाणी घातलं की लागलीच ते खाता येतात. अननसाचा रस किंवा अन्य पेयसुद्धा आम्ही पितो. मात्र ते पिण्यासाठी खास प्रकारचा स्ट्रॉ वापरला जातो,' असं सांगून त्यांनी तो स्ट्रॉ कसा असतो, ते मुलांना दाखवलं. (आपण वापरतो तो स्ट्रॉ हे अवकाशवीर का वापरू शकत नसतील, हे तुम्हा हुशार मुलांना माहीत असेल किंवा ती माहिती काढण्याइतके तुम्ही हुशार आहात!)

अवकाश-स्थानकामधला दिवस कसा असायचा?- सकाळी सहा वाजता जागं होऊन सर्व आटोपल्यावर त्यांना अवकाश स्थानकाची

**सुनीता विल्यम्स यांचे वडील दीपक पांड्या मूळचे गुजरातमधले, तर आई उर्सुलिन या स्लोव्हेनियाच्या. सुनीता यांचा जन्म ओहायो, अमेरिका येथे १९ सप्टेंबर १९६५ रोजी झाला.**

तपासणी करावी लागायची. त्यानंतर सर्व अंतराळवीर न्याहरी करायचे. मग दिवसभरात कोणकोणती कामं करायची हे ठरवण्यासाठी नियंत्रण कक्षातील अधिकाऱ्यांबरोबर बैठक व्हायची. मग सकाळचा व्यायाम. सकाळी ८.१० वाजता सर्व अवकाशवीर आपापलं काम सुरू करायचे. एक वाजता जेवणाची सुट्टी. ती संपली की दुपारच्या वेळात ठरवलेली कामं करून, सकाळपेक्षाही जास्त व्यायाम करायचे. सर्वच अवकाशवीर हे वजनरहित अवस्थेत राहात असतात. त्यामुळे त्यांच्या शरीरातील स्नायू शिथिल व्हायला लागतात. ते सैल पडले की, त्यांचा आकार कमी होतो, त्यांची ताकदही कमी होते. असं होऊ नये आणि अंतराळ स्थानकात शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त



राहावं, यासाठी त्यांना रोज ठरावीक व्यायाम करावाच लागतो. त्यासाठी खास सोय स्थानकात केलेली आहे. संध्याकाळी साडेसातपर्यंत ठरवलेली कामं पूर्ण करून नंतर सर्वजण रात्रीचं जेवण जेवून साडेनऊ वाजता झोपी जायचे. त्यांना चांगली झोप लागावी, म्हणून उजेडामुळे झोपेवर परिणाम होऊ नये म्हणून अवकाशस्थानकाच्या खिडक्या बंद केल्या जातात. कारण, ताशी २८,१६३.५२ किमी वेगानं फिरणारं अवकाश स्थानक ९३ मिनिटांत पृथ्वीभोवतीची प्रदक्षिणा पूर्ण करतं. या भ्रमणातच अवकाशस्थानकाला १६ वेळा सूर्योदय आणि सूर्यास्त पाहायला मिळतात. झोपण्यासाठी प्रत्येक अवकाशवीराला स्वतंत्र कक्ष असतो.

अंतराळ स्थानकात राहताना त्यांना किरणोत्सर्गापासून (radiation) धोका पोचू शकतो. लसिकापेशी (lymphosites) या रोगप्रतिकारयंत्रणेमध्ये अत्यंत महत्त्वाच्या असतात. त्यांनाच हानी पोचल्यामुळे एकंदरच रोगप्रतिकारशक्ती कमी होते. दुसरा धोका संभवतो तो मानसिक ताणाचा. या ताणाशी मुकाबला करण्यासाठी आणि मनाची स्थिती चांगली राहावी यासाठी सर्व प्रकारची काळजी घेतली जाते. प्रदीर्घ काळ अंतराळात राहणाऱ्यांच्या शरीरावर अनेक परिणाम होऊ शकतात. म्हणून ही मंडळी तब्येतीची खूप काळजी घेतात.

अंतराळातील कचरा आणि अवकाशस्थानकात निर्माण होणारी बुरशी (moulds) हेही घटक तापदायक ठरू शकतात. या बुरशीचं काहींना वावडं (ॲलर्जी) असतं.

थोडक्यात, अवकाशस्थानकात राहणं आपल्याला आकर्षक वाटलं तरी सोपं नाही. हा काळ परीक्षा पाहणारा असतो. प्रदीर्घ काळ सुनीता आणि विलमोर यांनी तिथे राहून काम केलं. तेही आधी तसं ठरलेलं नसताना.

न जाणो, तुम्हांला तुमच्या आयुष्यात अंतराळात कामासाठी किंवा पर्यटनासाठी जायची संधी मिळेलही. सुनीता विल्यम्स आणि विलमोर यांचे अनुभव तेव्हा तुम्हांला उपयोगी पडतील!

**–श्रीराम शिधये**
*shriramshidhaye@gmail.com*
*(ज्येष्ठ पत्रकार व विज्ञानलेखक)*

*(लेखातील फोटो इंटरनेटवरून साभार)*

## शब्दाशब्दी

**आज एक गमतीशीर शब्दखेळ खेळू या! खाली दिलेल्या दोन शब्दांत पहिल्या मराठी शब्दासाठी असलेला इंग्रजी शब्द सांग. त्या इंग्रजी शब्दाचा उच्चार दुसऱ्या मराठी शब्दासाठी मराठी प्रतिशब्द (समानार्थी शब्द) असेल.**

**उदाहरणार्थ- १) नाव, लक्ष्य : उत्तर- Name (नेम)**

**२) ध्येय, वर्तुळ : उत्तर- Goal (गोल)**

**खेळासाठी शब्द-**

**१.पाऊल, म्हणजेच १२ इंच**
**२. वस्तुमान, माहे**
**३. महाशय, माळ**
**४. जाळे, निव्वळ**
**५. गळा, प्रामाणिक**

**–कांचन जोशी,** *(संस्कृत अभ्यासक)*
*kanchanpjoshi76@gmail.com*

**उत्तर- १) Foot (फूट) २) Mass (मांस) ३) Sir (सर) ४) Net (नेट) ५) Nack (नाक)**



# किती रंग किती आकार...

सकाळ झाली तरी सूर्य
ढगामागे दडलेला
तरी त्याचा लख्ख प्रकाश
सगळीकडे पडलेला

कापसासारखे काही पुंजके
झाले होते सोनेरी
काही गुलाबी, काही केशरी,
काही झाले चंदेरी

किती रंग किती आकार
बदलत गेले ढगांचे
हे सगळे उपद्व्याप
होते एकट्या सूर्याचे

बारीक लक्ष होते माझे
एका काळ्या ढगावर
पक्के ठाऊक होते मला
सूर्य त्याच्याच पाठीवर

दडून बसलो मीही मग
हिरव्या एका फांदीवर
मलाच शोधण्यासाठी त्याने
हळूच काढलेन् डोके वर... !

–डॉ. संगीता बर्वे
*dr.sangeeta.barve@gmail.com*



*चित्रं- संतोष घोंगडे*

अचाट बुध्दीच्या अद्भुत गोष्टी

# स्कीन फ्रेंडली कपडे

**लेमेशियाला जाण्यासाठी बॅग भरत असताना आयोजकांचा फोन आला, "कपडे अजिबातच आणू नका. आम्ही देऊ तुम्हांला एकदम गरम नरम कपडे." आँ, कपड्यांशिवाय जायचं? पण गेलो तसाच, आणि पुरता चक्रावलो !**

**तुम्हांला** एक गंमत सांगायची राहिलीच की. मी लेमेशियाला जाण्यासाठी बॅग भरत होतो. तिथे कितपत थंडी असेल याचा अंदाज घेऊन गरम कपडे घ्यायचे, असं ठरवलं. नेटवर शोधलं पण काही अंदाज येईना. त्याच सुमारास लोफँगचा फोन आला. मी त्याला गरम कपड्यांविषयी विचारताच तो जोरजोरात हसू लागला.

मला कळेना, हे काय विचित्र? यात हसण्यासारखं काय आहे? थंडी असेल तर गरम कपडे घ्यावेच लागणार ना?

लोफँग म्हणाला, "राजीव सर, तुम्ही तुमचा लॅपटॉप आणि तुमची नेहमीची औषधं घेऊन या. कपडे मात्र अजिबातच आणू नका. आम्ही देऊ तुम्हांला एकदम गरम नरम कपडे."

आता माझी हसायची पाळी आली. कपडेच आणू नका म्हणजे? एकाच कपड्यावर फिरायचं? आणि 'हे मला कपडे देणार' म्हणजे लेमेशियामध्ये परदेशी पाहुण्यांना गणवेश घालावा लागतो की काय? परत जाताना तरी कपडे घालून जायचं की 'तसंच' जायचं? मला काही कळेचना. मी आत्तापर्यंत अनेक देशांना भेटी दिल्या आहेत, पण असला खुळचटपणा कधी ऐकला नव्हता.

मी वैतागून लोफँगला फोन केला, तेव्हा तो मला म्हणाला, "राजीव सर, प्लीज कपडे आणून बॅगेचं वजन वाढवू नका. तुमची पुस्तकं, लॅपटॉप आणि तुमची नेहमीची औषधं आणा, बस्स! आम्ही तुम्हांला 'भवताल पूरक कपडे' देऊ."

आता मला प्रश्न पडला. हे 'भवताल पूरक' म्हणजे काय? मी तसं लोफँगला विचारलंसुद्धा. अर्थातच त्याने काहीही सांगितलं नाही.

मी खरोखरीच कपडे न घेता प्रवासाची बॅग भरली. इतकी हलकी बॅग घेऊन परदेश प्रवास करण्याची ही माझी पहिलीच वेळ होती.

मी हॉटेल वोलँगशोला पोहोचलो, तेव्हा माझ्या कपड्यांचा सेट तयारच होता. रात्री झोपताना घालायचे कपडे निळ्या बॅगेत. इतरवेळी घालायचे



चित्र- गिरीश सहस्रबुद्धे

कपडे
पिवळ्या
बॅगेत.
बाहेर
जाताना
घालायचे कपडे
हिरव्या बॅगेत. आणि
काही जास्तीचे कपडे
पांढऱ्या बॅगेत. गंमत म्हणजे
निळ्या बॅगेत भरपूर कपडे होते. रात्री
झोपण्यासाठी हा एवढा कपड्यांचा
ढीग कशाला? मला
कळेना!

लोफँग म्हणाला, "राजीव सर, हे डिस्पोजेबल रिलॅक्स कपडे आहेत. रात्री झोपताना किंवा रुमवर आल्यावर घालायचे. सकाळी निळ्या डस्टबीनमध्ये टाकायचे. हे नंतर रिसायकल होतात. हे कापड नाही."

"ऑ? हे कापड नाही तर काय कागद आहे?"

"अगदी बरोबर बोललात राजीव सर. हा

सिल्कीनटॉस स्कीन-फ्रेंडली कागद आहे. अतिशय मुलायम आणि सुखद स्पर्श आहे याचा."

मी त्यातला एक रंगीत पायजमा काढला आणि त्याची बटणं शोधू लागलो. माझी अडचण ओळखून लोफँग म्हणाला, "सर, याला बटणं नाहीत. तुमच्या शरीराच्या आकाराप्रमाणे तो अॅडजेस्ट होतो, कारण यात मेमरी इलॅस्टीक आहे. हे क्लायमेट-फ्रेंडली आहेत. म्हणजे थंडी असेल तर हे कपडे आपोआप उबदार होतात आणि उन्हाळ्यात कूल कूल. कारण या सिल्कीनटॉस स्कीन फ्रेंडली कागदावर झीनबेंझोकॉम आणि हायड्रोकॉनझॉल यांचं कोटिंग केलेलं आहे. वापरून तर पाहा."

मी दुसऱ्या खोलीत जाऊन कपडे बदलले आणि खरंच मला छान उबदार वाटू लागलं.

लोफँग सांगू लागला, "या हिरव्या बॅगेतल्या कपड्यांची जादू तर औरच आहे."

"म्हणजे?"

"हे नुसतं कापड नाही किंवा फक्त कागद नाही, तर त्यांचं मिश्रण आहे. हे आहेत कॉटनेपर कपडे. उद्या सकाळी आपण एका शाळेला भेट द्यायला जाणार आहोत, तेव्हा तुम्ही हेच कपडे घालायचे आहेत. या कपड्यात सेन्सर आहेत आणि ते विविध प्रकारे काम करतात. तसंच यात भरपूर अॅडजेस्टमेंट पण आहेत."

"प्रिय लोफँग, मी हे सगळं पहिल्यांदाच पाहतो आहे. मला नीट समजावून सांग. म्हणजे कपड्यात काय-काय अॅडजेस्टमेंट आहेत ते नीट सांग. उद्या शाळेत गेल्यावर सर्वांसमोर माझी पंचाइत व्हायला नको. मी भलतीच अॅडजेस्टमेंट सुरू करायचो आणि मी भलत्याच अवस्थेत मुलांना दिसायचो... असं नको व्हायला."

आपलं हसू दाबत लोफँग म्हणाला, "राजीव सर, तुम्ही उगाच काळजी करता. तुम्ही काहीच करायचं नाही. जे काय करायचं ते ए. आय. करणार."

"अरे, मला समजेल असं सांग रे मित्रा."

"या कपड्यात जसे सेन्सर्स आहेत, तसे यासाठी पूरक सेन्सर्स पण अनेक ठिकाणी आहेत. ते एकमेकांशी देवाणघेवाण करत असतात. म्हणजे समजा, आपल्या शाळेतल्या प्रत्येक वर्गाचा ड्रेसकोड वेगळा आहे. त्यामुळे तुम्ही ज्या वर्गात जाल त्या वर्गाच्या ड्रेसकोडप्रमाणे तुमच्या कपड्यांचा रंग बदलेल. त्यामुळे तुम्ही मुलांना त्यांच्याच वर्गातले आणि अधिक फ्रेंडली वाटाल."

"वॉव! ही एकदम भन्नाट आयडिया आहे!"

"होय. आम्ही आमच्या शाळेतल्या सर्व शिक्षकांना याच प्रकारचे कपडे दिले आहेत. याची दुसरी गंमत म्हणजे, या कपड्यात ऑप्टिकल फायबरचे बारीक तंतूसुद्धा आहेत. त्यामुळे हे कपडे तुमच्या मोबाइलवरील अॅपद्वारे तुमच्याशी कनेक्टेड असतात."

"आता हे काय?"

"म्हणजे राजीव सर, तुम्ही तुमच्या अॅपद्वारे जसं हे कपडे सैल किंवा घट्ट करू शकता तसंच या कपड्यांचं इंटर्नल टेंपरेचर कंट्रोल करू शकता. तुम्ही डिझाइन सिलेक्ट केलंत तर तुम्ही त्याप्रमाणे कपड्यांचं रंग, डिझाइन आणि पोत बदलू शकता आणि गंमत म्हणजे तुमचा आवाज रेकॉर्ड झाला की तुम्ही व्हॉइस कमांड देऊ शकता."

"आता सांगून संपलं, की अजून काही आहे?"

"खरंतर अजून खूप काही आहे. मुख्य म्हणजे हे वॉटरप्रुफ पण आहेत. जर अचानक पाऊस आला किंवा स्नो फॉल सुरू झाला तरी हे कपडे तुमचं संरक्षण करतात. यात आणखी पण अनेक खुब्या आहेत. पण तुम्ही वापरून वापरून कपड्यांशी जशी मैत्री कराल त्याप्रमाणात कपडे तुम्हांला प्रतिसाद देऊ लागतात."

"म्हणजे माझ्या वागण्यातून आणि माझ्या सवयीतून हे कपडे अनेक गोष्टी शिकतात आणि नंतर मग मला शिकवतात. हो ना?"

"अगदी बरोबर राजीव सर. ही सगळी डीप मशीन लर्निंगची किमया."

"अरे मित्रा लोफँग, मला सोप्या भाषेत सांगत जा बरं. आता मला त्या पिवळ्या बॅगेतल्या कपड्यांविषयी अगदी थोडक्यात सांग बरं."

"राजीव सर, मी तुम्हांला एक विनंती करू का?"

"ओह शुअर!"

"मी तुम्हांला या दोन बॅगेतल्या कपड्यांविषयी सविस्तर सांगितलं आहे. आता मी तुम्हांला लिंक पाठवतो. तुम्ही ॲप डाउनलोड करा. त्यात सर्व इन्फो आहे. आता मला गेलं पाहिजे. तुमच्या उद्याच्या भेटीची मला तयारी करायची आहे."



मला लिंक देऊन लोफँग गेला. मी ॲप डाउनलोड करून कपाट उघडलं. कपाटात निळ्या, पिवळ्या, हिरव्या आणि पांढऱ्या रंगांचे चार खण होते. मी निळी बॅग उचलली आणि कपाटात ठेवू लागलो, पण ती आतच जाईना. बॅग मला मागे ढकलू लागली. मी चमकलो! हा काय विचित्र प्रकार? ही काही भुताटकी तर नव्हे ना?

मी जोर करून बॅग आत ढकलली. तेवढ्याच जोराने बॅगेने मला मागे ढकललं आणि धाडकन कपाट बंद झालं. मी बॅग बाजूला ठेवून कपाट उघडण्याचा प्रयत्न करू लागलो. पण छे!

आता काय करावं, असा विचार करत असतानाच, खिशातला मोबाइल गरम होऊन नम्रपणे म्हणाला, "राजीव सर, प्रथम कपाट अनलॉक करा. आणि मग निळ्या रंगाची बॅग निळ्या खणातच ठेवा. आजपासून 'पाळा शिस्त आणि राहा मस्त'. या बॅगांची आणखी एक गंमत म्हणजे, निळी बॅग सकाळी ७ ते रात्री ७ पर्यंत कपाटात आपोआप लॉक होते. कपाटातून बाहेर काढता येत नाही. प्रत्येक बॅगेला बाहेर येण्याची आणि आत जाण्याची वेळ ठरवून दिलेली आहे."

माझ्यासाठी हे सगळंच नवीन होतं. कपड्यांचंच काय, पण बॅगांचं पण आपल्यावर लक्ष आहे, या विचारानेच मी बेचैन होऊन बेडवर बसलो.

बेड थरथरला आणि म्हणाला, "राजीव सर, तुमच्यासाठी भारतीय जेवण तयार आहे. कृपया ऑर्डर करा. जेवल्यावर १३ मिनिटं बागेत चालून आलात तरच दरवाजा उघडेल. मगच इथे झोपायला या."

माझ्या कपड्यातले सेन्सर्स कुठे-कुठे कनेक्ट आहेत कोण जाणे? मी जेवून २१ मिनिटं बागेत फिरलो. रुमवर येताच दरवाजा म्हणाला, "वेलकम राजीव सर, आठ मिनिटं अधिक चालल्याबद्दल तुमचं अभिनंदन."

मी प्रवासाने थकलो होतो. मी बेडवर पडलो. दिवे मंद झाले. बेड उबदार झाला. कपडेसुद्धा! खोलीतलं वातावरण बदललं. जणू काही मी समुद्रकिनारी वाळवंटात झोपलो आहे, असं मला वाटू लागलं. समुद्राची गाज ऐकू येऊ लागली. खोलीभर चांदणं पसरलं. त्यानंतर पुढे काहीच कळलं नाही.

**–राजीव तांबे**
*mulansobat@gmail.com*
*(प्रसिद्ध बालसाहित्यिक)*






# राणी रासमणी

**१८४० साली** इंग्रजांच्या अधिपत्याखाली असलेल्या बंगालमध्ये घडलेला एक ऐतिहासिक प्रसंग! वर्षानुवर्षांपासून गंगेच्या पाण्यावर मासेमारीचा व्यवसाय चालत आलेला होता. शेकडो कोळी कुटुंबांची उपजीविका त्यावर चालत असे. तरीही या मासेमाऱ्यांमुळे मालाची ने-आण करणाऱ्या जहाजांना मोठा अडथळा निर्माण होतो, हे कारण पुढे करून इंग्रज अधिकाऱ्यांनी हुगळी नदीमध्ये मासेमारी करण्यावर मोठा कर लावला. हुगळी म्हणजे गंगेची उपनदी! इंग्रजांच्या या धोरणाविरुद्ध दाद मागत कोळी बांधव राणी रासमणीकडे (बोलीभाषेत रशमोनी) गेले. इंग्रजांची धूर्त चाल राणीने चांगलीच ओळखली. पुढे ज्या चातुर्याने तिने त्यांना काटशह दिला, ते अवाक् करणारं होतं!

हुगळी नदीतला १० किलोमीटर लांब प्रवाहाचा पट्टा इस्ट इंडिया कंपनीकडून राणीने भाड्याने घेतला. तसा करार करून झाल्यावर तिने प्रचंड मोठ्या साखळ्या दोन्ही बाजूंनी लावल्या. इथे नदीचा प्रवाह धनुष्याकार झालेला होता. या ठिकाणी तिने तिची खाजगी मालमत्ता जाहीर करत मासेमाऱ्यांना काम सुरू करण्यास सांगितलं. तिथे हळूहळू त्यांची गर्दी झाली, त्यामुळे नदीवरची इतर रहदारी ठप्प झाली. केवढं हे राणीचं धाडस! यामुळे इंग्रज संतापले आणि त्यांनी राणीला स्पष्टीकरण मागणारी कायदेशीर नोटिस बजावली. तरीही राणी डगमगली नाही. तिने उत्तर दिलं, "ही जागा मी इस्ट इंडिया कंपनीकडून भाड्याने घेतलेली आहे. त्यामुळे स्वतःच्या मालमत्तेतून होणाऱ्या उत्पन्नाचं रक्षण करण्याचा अधिकार मला खुद्द कंपनीचाच कायदा देतो! हे मान्य नसेल तर तुम्ही न्यायालयात रीतसर दावा दाखल करू शकता. जोपर्यंत तिथे न्यायनिवाडा होत नाही, तोपर्यंत या साखळ्या काढल्या जाणार नाहीत आणि मासेमारी सुरूच राहील."

राणीने अशा प्रकारे नाक बंद करून इंग्रजांचं

**आपल्या देशावर राज्य करणाऱ्या इंग्रज सरकारकडून भारतीय जनतेवर होणारे अन्याय दूर करणाऱ्या, भारतीयांसाठी मूलभूत सुविधा निर्माण करणाऱ्या राणी रासमणीचं चातुर्य आणि धैर्य अलौकिक होतं. या धाडसी राणीचं कर्तृत्व जाणून घेऊ या, भारतीय सैन्यात काम केलेल्या साहसी आणि अभ्यासू लेखिकेकडून-**

तोंड उघडलं! त्यांनी मासेमारीवर लावलेला कर रद्द केला! गंगा सर्वांसाठी खुली झाली. कोळी बांधवांचा आनंद गगनात मावेना! या घटनेचा एवढा मोठा परिणाम होता की, गंगेच्या पाण्याला 'राणी रासमणी जल' असं नाव पडलं! वेळोवेळी असं धाडस दाखवणारी 'लोकमाता' राणी रशमोनी म्हणजे फार धाडसी वीरांगना!

१७९३ साली कलकत्त्याजवळच्या कोना नावाच्या एका छोट्या गावात रासमणीचा जन्म झाला. तिला दोन भावंडं होती. परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांचं बालपण अतिशय खडतर होतं. त्यात रासमणी अवघी सात वर्षांची असताना तिची आई हे जग सोडून गेली. त्या काळच्या प्रथेनुसार किशोरी वयातच तिचं लग्नं राजचंद्र दास नावाच्या तरुण जमीनदाराशी झालं. राणी आता अतिशय मोठ्या, सधन कुटुंबात आली. राजचंद्र दास हा बुद्धिमान व्यापारी तर होताच, परंतु वृत्तीने स्वतंत्र होता. राजा राममोहन रॉय यांच्या विचारांच्या प्रभावाने तो सुधारणावादी झाला होता. त्याने राणीला कधीही चार भिंतींच्या आड राहण्याची सक्ती केली नाही, उलट तिच्यावर जबाबदारी टाकत तिला सक्षम केलं. अनेक गोष्टी शिकवल्या. त्यामुळे ती व्यवहारात तरबेज झाली. तिला समाजकारण समजू लागलं. जनबाजार इथे बांधलेली त्यांची हवेली आजही आपल्याला बघता येते.

राणीने लोककल्याणाचा वसा घेतला होता. गंगेच्या किनारी अनेक वृद्ध, रोगी येऊन राहात. त्यांच्या सोयीसाठी तिथे तिने घाट बांधून घेतले. त्यांच्यावर उपचार करण्यासाठी डॉक्टरसुद्धा नियुक्त केले. १८२३ साली गंगा नदीला मोठा पूर आला, त्यावेळी अत्यंत ममतेनं तिने लोकांना आश्रय दिला, त्यांना अन्नधान्य पुरवलं.

१८३३ साली लागू झालेला सनदी कायदा अर्थात् The Charter Act जमीनदारीचं स्वरूप बदलून गेला. जमीनदारांचे अनेक अधिकार संपुष्टात आले. यामागोमाग १८३६ मध्ये राजचंद्र दास याचं निधन झालं. त्याकाळी बंगालमध्ये विधवांवर खूप बंधनं होती. परंतु स्वतः त्यात न अडकण्याचं मोठं धाडस दाखवत रासमणी खंबीरपणे प्रचंड मोठी जहागीर सांभाळण्यासाठी सिद्ध झाली. तिची जहागिरी बळकावण्यासाठी आलेल्या कित्येक जणांना धडा शिकवून तिने परत पाठवलं. मोठमोठ्या प्रतिष्ठित लोकांकडे थकलेली कर्जाची रक्कम तिने वसूल केली. चोरी, दरोडा घालणाऱ्या कितीतरी हातांना तिने काम दिलं आणि त्यांची कुटुंब वसवली! पुढे ३० वर्षं तिने ती जहागीर सांभाळली. तिच्यासाठी ती जहागीर म्हणजे लोककल्याणाचं आणि समाजसुधारणेचं एक माध्यम होतं! पारतंत्र्यात असलेल्या व्यथित समाजाला तिने पंखांखाली घेतलं. त्यांच्यासाठी रस्ते, नाले, पाणी, घरं अशा अनेक मूलभूत सुविधा निर्माण केल्या. ग्रंथालयं, शिक्षण संस्था यांना मोठी आर्थिक मदत केली.

बंगालमध्ये दिवसेंदिवस वाढतच जाणारे इंग्रजांचे अत्याचार पाहून राणीने त्यांच्याविरुद्ध वेळोवेळी बंड पुकारलं. दुर्गा उत्सवात मिरवणूक काढली, म्हणून इंग्रजांनी राणीला ५०० रुपये दंड ठोठावला. तिने तो भरला, मात्र तिच्या जहागिरीत मोडणारा जनबाजाराकडे जाणारा मोठा रस्ता दोन्ही बाजूंनी बंद केला. प्रचंड संख्येने भारतीय राणीच्या बाजूने उभे राहिले. तिने इंग्रज अधिकाऱ्यांना अगदी पेचात टाकलं. त्यांना तिचा दंड मागे घ्यावा लागलाच, शिवाय तो रस्ता उघडण्यासाठी विनंती करणारं पत्र त्यांना लिहावं लागलं!

तिच्या हवेलीवर हल्ला करून तोडफोड करणाऱ्या इंग्रज सैन्यासमोर तलवार घेऊन उभी असलेली कालिका रूपातली रासमणी पुढे खरोखर कलकत्त्याच्या सुप्रसिद्ध कालीमंदिराची निर्माती झाली! तिने मंदिर बांधायला घेतलं, पण तेव्हाच्या वर्णव्यवस्थेनुसार शूद्र वर्णात मोडणाऱ्या या राणीला कुणीही जागा देईना. परंतु निराश न होता मोठ्या संघर्षातून वाट काढून तिने मंदिर बांधण्याचा संकल्प पूर्ण केला. तिथे पूजा करायला तयार झालेल्या पुजाऱ्याचा धाकटा भाऊ गदाधर म्हणजे आध्यात्मिक शक्तीचे उपासक श्रीरामकृष्ण परमहंस! सगळे भेद मागे सारून श्रीरामकृष्ण आणि राणी रासमणी यांचं गुरू–शिष्याचं नातं दृढ होत गेलं.

राणी रासमणीच्या स्मरणार्थ १९९४ साली काढलेलं पोस्टाचं तिकीट, कलकत्त्याजवळ उभारलेले तिचे पुतळे, तिच्या नावे बांधलेला घाट, एवढंच काय पण २०१८ साली भारतीय तटरक्षक दलाने IPV तंत्रज्ञानाच्या नौकेला दिलेलं तिचं नाव, तिच्यावरचा चित्रपट, मालिका या स्वरूपांत तिचं काम पुन्हा पुन्हा आठवलं जातं.

**–मेजर मोहिनी गर्गे–कुलकर्णी (निवृत्त)**
*mohinigarge2007@gmail.com*

# प्रतिक्रिया

नमस्कार राजीव काका,

'वयम्' मासिकातील तुमची गोष्ट वाचली. खूपच मजेशीर वाटली लेमेशिया देशाची 'हवेतील वीज' ही गोष्ट! आम्हांला खूप मजा वाटली आणि आश्चर्यसुद्धा!

तुम्ही कृपया त्या देशाची माहिती किंवा **google link** पाठवाल का? आम्हांला **google** करूनही त्याबद्दल काही सापडले नाही.

-शताक्षी आणि संचित

प्रिय शताक्षी आणि संचित,

लेमेशिया खरंच विलक्षण आहे. उद्या मी काय पाहणार आहे, याचा मी अंदाजदेखील करू शकत नाही. या देशाचे लोकेशन किंवा आणखी काही सविस्तर माहिती मी कुणाला न देणे, हे माझ्यासाठी बंधनकारक आहे. त्यामुळे मी आणखी काही सांगू शकणार नाही. मी डिसेंबरला जर त्यातून मुक्त झालो तर मात्र सविस्तर सारे सांगता येईल असे वाटते.

तोपर्यंत 'वयम्'मधून भेटत राहू. तुम्हीसुद्धा या गोष्टी तुम्हांला कशा वाटतात ते कळवत राहा. परदेशात असताना आपल्या माणसांकडून मराठी इमेल आली की वाचताना आनंद होतो. संपर्कात राहू.

दोस्त,
राजीव तांबे

# Could, Should, Would?

## Witty Talks

**Noundita :** *Could you get me a glass of water? Cold water, please!*

*<Noundita requested as soon as she reached home.>*

**Verbojith :** *Sure. But where's your sun coat?*

*<Verbojith went to get water.>*

**Noundita :** *I don't wear any sun coat!*

**Verbojith :** *Hey, you should, while going out. It's so hot outside! It could cause sunburns.*

**Noundita :** *I know. Let me check if I get it online.*

**Verbojith :** *Or you could go to a nearby store.*

**Noundita :** *Given a choice, I would love to sit at home doing nothing.*

**Verbojith :** *No one is giving you this choice, anyway!*

**Noundita :** *But I could surely give you a chance to find out the fun in our conversation.*

**Verbojith :** *Fun? Grammar fun as always, eh?*

**Noundita :** *Yes! You could try to find...*

*<Verbojith thought for a while.>*

**Verbojith :** *Not getting it!*

**Noundita :** *Could, Should, Would... How could you not get it? You should have! I would have given you some gift, only if you could!*

**Verbojith :** *Wait, wait! Let me register all this...*

**Noundita :** *It is easy to understand, my friend! Could, Should, Would are modal verbs or helping verbs that indicate ability, possibility, necessity or willingness. They do not change form or tense.*

**Verbojith :** *Could you explain more?*

**Noundita :** *Here you go! Could is used to explain a possibility, slight or uncertain. You asked me for that possibility to explain more, isn't it?*

**Verbojith :** *Ok!*

**Noundita :** *You insisted I should buy a sun coat for protection. You made it almost obligatory for me to buy one. It is a good piece of advice. That's exactly what should does!*

**Verbojith :** *Gotcha! And would indicates something was possible but not any longer! So, I wouldn't have my gift now as I couldn't find what you meant, right?*

**Noundita :** *I hoped you could! May be you should observe more and I would give you some more practice...*

*<Noundita smiled and Verbojith gave her a high-five.>*

**-Prachi Mokashi**
*mokashiprachi@gmail.com*



# रशियाची सुरस सफर

**रशियातील** मॉस्को आणि पीटर्सबर्ग ही दोन्ही काही पर्यटकांसाठी लोकप्रिय ठिकाणं नव्हेत. त्यातही आत्ता युद्धाच्या बातम्या सतत कानांवर, डोळ्यांवर आदळत असताना तर नक्कीच नव्हेत. असं असताना आम्ही तिथे का चाललो आहोत याबद्दल अनेकांना कुतूहल होतं. माझी नणंद अदिती जोशी हिची नियुक्ती रशियातील भारतीय दूतावासामध्ये झाली होती. 'जवाहरलाल नेहरू कल्चरल सेंटर' (मॉस्को) मध्ये ती भारतीय शास्त्रीय संगीत शिकवत होती. तिच्या विद्यार्थ्यांमध्ये बरेचसे रशियन तरुण-तरुणी आणि काही परदेशस्थ भारतीय विद्यार्थी असा भरणा असे. तिथे त्यांनी गणपती बसवला, रशियन मंडळींनी साग्रसंगीत भजनं म्हटली. सर्व काही सुशेगात चालू आहे, असं तिच्याशी बोलताना ती आवर्जून सांगत असे. आपल्याला टीव्ही किंवा बातम्यांमध्ये बघून वाटतं की, सगळीकडे रणगाडे रस्त्यावर उतरले आहेत, बॉम्बहल्ले होत आहेत. पण असं काहीही नाही, अशी तिने ग्वाही दिली होती. म्हणूनच हिय्या करून आम्हीही काही महिन्यांपूर्वी तिथे जायचं ठरवलं.

आम्ही तिथे पोचताच जाणवलं की, रशियाची राजधानी मॉस्कोमध्ये सगळं अगदी नियमित, शिस्तीत चालू होतं. फूटपाथवर घड्याळाच्या काट्यावर चालणारी माणसं आणि रस्त्यावर सिग्नलच्या तालावर धावणारी वाहनं दिसत होती. प्रगत देशांतील शिस्तबद्ध वाहतुकीचा आपल्याला जसा प्रचंड हेवा वाटतो, तसाच इथेही वाटला.

मेट्रोचा प्रवास अत्यंत सुखद होता. धावतपळत मेट्रोमध्ये शिरणे हा प्रकार नाहीच. पावडर घालून गुळगुळीत केलेल्या कॅरम बोर्डवर सोंगट्या सहजगत्या सरकाव्यात, तशी माणसं मेट्रो स्टेशनावर इकडून तिकडे जाताना दिसत.

रशियन भाषेत आणि इंग्लिश भाषेतही प्रत्येक स्टेशनचे नाव लिहिलेले दिसे. पण ती नावं म्हणजे जिभेला कोलांट्याउड्या मारायला लावणारी! मॉस्कोमध्ये २५ वर्षं काढूनही krasnophresnenskaya या स्टेशनचं नाव पहिल्या झटक्यात म्हणता येत नाही, अशी कबुली एका भारतीय परिचिताने दिली. Novolozarevskaya याचे स्पेलिंग किंवा उच्चार काहीच धड न जमल्याने गुगलवर ते शोधणं कठीण जात असे. मग 'छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस' असं म्हणायची वेळ आली तर विदेशी मंडळींची कशी भंबेरी उडेल, याची मी मनात कल्पना करून खूप हसून घेत असे. 'थँक्यू'ला, 'स्पासिबा' म्हणतात हे घोटून घोटून लक्षात ठेवलं. मात्र, वेलकम आणि प्लीज दोन्हीला pujalaska

(पजालस्का) हा एकच शब्द आणि izvinite (इजविनीते) म्हणजे 'excuse me' किंवा 'sorry' असं देखील. बसमध्ये चढताना एकाला माझा धक्का लागल्यावर मी आधी भारतीय सवयीने चटकन नमस्कार केल्यासारखं केलं. आपण आत्ता रशियन भूमीवर आहोत हे चटकन लक्षात आलं. मग गुगल ट्रान्सलेट उघडून, 'सॉरी'ला काय म्हणतात हे बघितले. तोपर्यंत, ज्याला धक्का लागला होता तो माणूस बसमधून उतरून गेला होता! सॉरी, प्लीज, थँक यू वगैरे शब्द रशियन मंडळी मुक्त हस्ताने पेरत असली तरी चेहऱ्यावर त्याला साजेसा भाव नसे. एकूणच रशियन मंडळींचं हसण्याचं प्रमाण अत्यंत कमीच. रशियन 'अ-स्मिता', दुसरं काय!

पहिल्याच दिवशी रशियामध्ये पाऊल ठेवण्याआधी गाठ पडली ती इमिग्रेशनच्या खिडकीमागे बसलेल्या महाकाय गौरवर्णीय महिला ऑफिसरशी. माझ्या कमी उंचीमुळे आधी बराच वेळ तिला मी दिसलेच नसावे. कारण ती खिडकी साधारण रशियन माणसाच्या उंचीच्या प्रमाणात बनवली असावी. मग मी चवड्यांवर उभं राहून तिचं लक्ष वेधलं. त्यावर तिने नाइलाजाने माझ्याकडे बघितलं. 'आलातच का आमच्या देशात? बरं आता आलाच आहात तर या. मात्र फार दिवस राहू नका म्हणजे झालं, असा भाव तिच्या चेहऱ्यावर दिसत होता. अर्थात तिने काही स्वागतासाठी पायघड्या अंथराव्यात अशी माझी अपेक्षा नव्हती, परंतु एक हसू इतकं महाग का असावं? रशियन लोकांमध्ये एकूणच हसण्याचं प्रमाण अंमळ कमी आहे. कामावाचून उगाच हसणं हे तर तिथे उद्धटपणाचं लक्षण समजलं जातं. त्यामुळे आमच्याकडे बघून अशी हसणारी 'उद्धट' माणसं फारशी भेटली नाहीत. वर्षातले सात-आठ महिने मुक्कामाला येणारी गोठवणारी थंडी यांच्या चेहऱ्यावरचं हसू थिजवत असेल का?

मॉस्कोतील मेट्रो स्टेशन्स यावर एक वेगळं फोटो फीचर करायला हवं असं वाटावं इतकी देखणी स्टेशन्स आहेत. सुंदर चित्रं, झुंबरं. प्रत्येकस्टेशन वेगळ्या प्रकारे सजलेले; स्वतःचे वैशिष्ट्य जपून असलेले. मायकोवस्काया हेतिथले सर्वांत सुंदर स्टेशन समजले जाते. ते आम्ही शेवटच्या दिवशी मुद्दाम बघायलागेलो होतो. ते बघण्याअगोदर इतरही इतकी सुंदर स्टेशन्स बघितली होती की, गोड खाऊन खाऊन जिभेला मिठी बसावी तसंच डोळ्यांनाही झालं. काही विशेष वाटलंच नाही.

हळूहळू एखादी भाषा कानावर झिरपून झिरपून त्यातले काही शब्द कळू लागतात. एखाद्या ओळखीच्या शब्दाचा दुवा सापडला की, उगाचच एक आपलेपणा वाटतो. रशियन भाषेत साखरेला साखरच म्हणतात हे ऐकून गोड वाटलं. पण मग लक्षात आलं sucre (फ्रेंच) शक्कर (हिंदी) आणि शर्करा (संस्कृत) यांचं उगमस्थळ एकच असणार की. Sugar tastes sweet by any other name (and for all 'tongues'!) याचाही साक्षात्कार झाला. मॉस्कोमध्ये फिरताना आमचं आम्ही आणि पीटर्सबर्गमध्ये गाईडचं बोट धरून फिरलो. सेंट पीटर्सबर्गची गाईड छान होती. समोरचे श्रोते कोण आहेत यानुसार ती आपलं निवेदन बदलत असे. एका चित्रात स्वीडनचा पराभव झाल्यानंतरचं दृश्य होतं. त्या चित्राचं नाव तिने आम्हांला सांगितले- 'बॅटल ऑफ व्हिक्टरी'. परंतु स्वीडिश ग्रुपसमोरती त्याचा उल्लेख एकदम हुशारीने 'द बॅटल' एवढाच करत असे. न जाणो, त्यातून कोणाच्या भावना दुखवायला नकोत! पुढे गप्पांच्या ओघात आत्ताच्या लढायांचा उल्लेख झाला, तेव्हा ती म्हणाली, "अनेकांना आमचा देश युद्धखोर वाटतो. पण दोन्ही महायुद्धांमध्ये रशियातल्या प्रत्येक घराने

Indian Council for Cultural Relations (भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद) हा आपल्या देशाच्या परराष्ट्र मंत्रालयाचा एक विभाग. त्यातर्फे रशियातील भारतीय दूतावासामध्ये अदिती जोशी यांची नियुक्ती झाली होती. त्यांचा अनुभव-

जरी रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध सुरू होते, तरी तेथील मुलांचे शिक्षण सुरळीत चालू होते. ICCR ह्या संस्थेतर्फे रशियन नागरिकांना भारतीय कला शिकण्याची संधी मिळते. मी मुळात संगीत अभ्यासक, गायिका. नव्या पिढीला बॉलिवूडच्या धाग्याने जोडून घेऊन बंदिशी, चीजा, तराण्यांकडे नेण्याचा माझा प्रयत्न असे. विशेषतः कधीच भारतीय शास्त्रीय संगीत ऐकलेले नाही अशा लहान मुलांना त्यांच्या त्यांना किंचित ओळखीच्या सुरावटीवरून हळूहळू रागदारी शिकवली तर त्यांना आवडत असे.

रामायणाच्या, कृष्णाच्या, दुष्यंत-शकुंतलेच्या कथा तेथील काहींना माहीत आहेत. त्यामुळे संगीत शिकवताना 'रघुवर लंकेवर विजय मिळवून आले' अशी चीज आली, किंवा कृष्णाच्या वृंदावनाचा उल्लेख आला की, काहींचे कुतूहल चाळवले जाई. मग ती गोष्टही मी सांगत असे.

योग आणि नृत्यकला म्हणजे कथ्थक, भरतनाट्यम्, मोहिनीअट्टम् हे सारे गेल्या वीस वर्षांपासून शिकवले जाते आहे. रशियन मुले, मुली हौशीने नृत्य शिकतात आणि भारतीय पद्धतीचे पारंपरिक कपडे, दागिने वगैरे घालून उत्तम नृत्य पेश करतात. आम्ही अधूनमधून त्यांचे कार्यक्रम आयोजित करायचो.

आपण भारतीय कधी कोणाला येता-जाता सरसकट वाकून नमस्कार करत नाही. त्यातही साष्टांग नमस्कार तर फक्त देवाच्या मूर्तीला घालतो. पण इथल्या काही मुलांना साष्टांग नमस्कार माहीत होता. काही रशियन विद्यार्थी मला त्यांची गुरू म्हणून चक्क साष्टांग नमस्कार करायचे. मग मला त्याला नमस्कारांमधले फरक आणि भावना समजावून सांगाव्या लागायच्या. गंमत म्हणजे ही मुले त्यांच्या पाककलेचा नमुना म्हणून पेस्ट्री, केक करून तो नैवेद्य म्हणून आणायची.

मी या विद्यार्थ्यांसाठी पोहे, शिरा, मोदक असा खास मराठमोळा खाऊ करायचे. त्यांना त्याचे कोण कौतुक वाटायचे! गुरू गृही येऊन शिकणे आणि गुरूच्या हातचे असे पदार्थ खायला मिळणे याचे त्यांना फार अप्रूप वाटायचे. परक्या भूमीत, संस्कृतीत जाऊन भारतीय संस्कृतीची ओळख त्यांना करून द्यायची, तर त्यांच्या पोटात शिरायचा हा हुकमी मार्ग होता!

**-अदिती जोशी**


वाद्यांची पूजा

खूप काही गमावलं आहे. असं असताना मुद्दाम युद्ध करावं असं आम्हांला का वाटेल?"

खरंच आहे. सामान्य जनतेला युद्ध व्हावं असं थोडंच मनात असणार? पण राजकारण्यांच्या पुढे कोणाच्या मताचा काय टिकाव लागणार!

रशियातले दिवस भराभर सरले. भरपूर फिरणं, मॅप पाहत भलभलत्या रस्त्यांना लागणं, चुकणं आणि पुन्हा रस्त्याला लागणं, नवीन पदार्थ चाखणं, नवे शब्द शिकणं असा भरगच्च दिवस असे. 'आपल्याकडे असं नसतं, नाही? काय बाई विचित्र तऱ्हा!' इथपासून ते 'अरेच्चा! असं पण असतं का?' आणि तिथून पुढे 'असेल बुवा! त्यांचंही बरोबर आहे!' इथपर्यंत हळूहळू प्रवास होत होता. शेवटी प्रवास नुसता 'बाहेरचीच' दृश्ये पाहण्यासाठी नसतो ना! प्रवास आपल्याला मनात डोकवायला शिकवतो.

शेवटचा दिवस उजाडला. टॅक्सीने मॉस्को एअरपोर्ट गाठलं. गेल्या आठ ते दहा दिवसांत इतकी संग्रहालयं बघितली होती की, 'किसे याद रखू किसे भूल जाऊ, इसी कश्मकश मे जिये जा रहा हूँ' या गजलची आठवण आली. पण विमानातून न्यायच्या सामानावर वजनाचे निर्बंध असतात, तशाच आठवणीदेखील सगळ्याच काही साठवता येत नाहीत! फोटोत न पकडता आलेली कितीतरी सुंदर दृश्यं आणि शब्दांच्या चिमटीतून निसटलेले अनुभव तिथेच सोडूनच द्यावे लागले!! रशियातून परतताना मात्र इमिग्रेशन ऑफिसमधल्या बाईने झटपट काम केले. आमच्या पासपोर्टवर शिक्के मारले. मीही आठवणीने दसविदानिया (म्हणजे बाय बाय) म्हटले आणि अहो आश्चर्यम्, खिडकी पलीकडच्या चेहऱ्यावरचा बर्फ वितळला! रशियन 'अ-स्मिता' खिडकीतून किंचित खाली झुकली आणि लख्ख हसली की!


मनात आलं, आपणसुद्धा खिडकीच्या अलीकडे उभे राहून तेच नसतो का करत? आपणही आपल्या मनाच्या खिडकीत बसून तुटपुंज्या माहितीच्या तुकड्यांवर आधारित 'अमुक माणूस चांगला' किंवा 'अमका वाईट' असे शिक्के नकळत मारत असतो. प्रवासात बाकी काही दिसो न दिसो, निदान आपापली खिडकी तरी मोठी व्हावी!

**–सावनी गोडबोले**
*savpras@yahoo.com*

# Hide & Seek

Illustrated by Mahimkar Sisters

Some objects are playing hide and seek, can you find them all?




₹10
massage
ROOTS
RAINBOW
Popcorn
Lips
ag
Cupcake
Brush
Boat
Traffic
cone
Toast
Window
Leaf




# फ्लो-प्रेरणा देणारा सिनेमा

**यंदाच्या** ऑस्कर पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट ॲनिमेटेड चित्रपटाचा पुरस्कार मिळवणारा चित्रपट 'फ्लो' म्हणजे एका मांजराची गोष्ट आहे.

गोष्ट घडते तो काळ आहे, पृथ्वीवरून माणूस नाहीसा झाल्यानंतरचा. आता सगळं प्राण्यांचंच राज्य आहे. हे मांजर राहातं ते त्याच्या छानशा, परंतु आता निर्मनुष्य झालेल्या घरात. एके दिवशी ते बाहेर भटकत असताना पाण्याचा एक प्रचंड लोंढा येऊन पुरासारखी परिस्थिती तयार करतो. पाणी जसजसं वाढत जातं, तसं मांजराला अधिकाधिक उंचीवरची जागा गाठावी लागते. अखेर जेव्हा सगळाच प्रदेश जलमय होतो, तेव्हा जवळून जाणाऱ्या एका होडीत मांजर आसरा घेतं. या होडीत आधीपासूनच कॅपीबारा हा मोठाल्या उंदरासारखा दिसणारा प्राणी असतो. लवकरच होडीच्या आश्रयाला इतरही काही प्राणी- पक्षी येतात आणि एका नव्या साहसाला सुरुवात होते.

'फ्लो'ची गंमत अशी, की त्याचा दिग्दर्शक, निर्माता, आणि मुख्य ॲनिमेटर असलेल्या गिन्ट्स झिलबलोडीस याने प्राण्यांचं चित्रण हे खऱ्याखुऱ्या प्राण्यांसारखं केलंय. हे प्राणी डिझ्नीच्या चित्रपटातल्यासारखे माणसासारखं वागत नाहीत, दोन पायांवर चालत नाहीत, संवाद बोलत नाहीत. त्यामुळे ॲनिमेटेड चित्रपटापेक्षाही लाईव्ह ॲक्शन चित्रपट पाहिल्याचाच परिणाम ते सहज साधतात. या प्राण्यांच्या लकबी, त्यांचे आवाज, हावभाव यांमधूनच

या प्राण्यांची व्यक्तिमत्त्वं तयार होतात.

'फ्लो'मध्ये भाषेचा वापर नाही. प्राण्यांमधला संवाद घडवतानाही हे प्राणी वेगवेगळ्या प्रजातींमधून आल्याचं हा चित्रपट लक्षात ठेवतो. केवळ सहवासातून या प्राण्यांमध्ये काय आणि कसं नातं तयार होईल, हे पाहातो. त्यामुळे चित्रपट खूप गतिमान होत नाही, पण सहज न मिळणारा अनुभव देऊन जातो. इथले प्राणी खऱ्यासारखे असले तरी चित्रपट पूर्णपणे वास्तवाच्या कक्षेत बसणारा मात्र नाही. मानवरहित जगापासून अनेक घटक इथे आहेत, जे थोडा फॅन्टसीचाही आधार घेतात. भाषेवाचून हे सारं कळणं शक्य आहे, पण त्यासाठी चित्रपट पाहणारी आपली नजर चांगली हवी.

दिग्दर्शक झिलबलोडीस याने आजवर एकट्याने लॅपटॉपवर काम केलं होतं, इतरांची मदत घेतली नव्हती. या वेळी प्रथमच त्याने टीमबरोबर काम केलंय. त्यामुळेच मी ऐकलेल्या एका मुलाखतीत त्याने स्वतःची तुलना 'फ्लो'मधल्या मांजराशी केली आहे. एकटं राहणारं मांजर जसं बोटीतून प्रवास करताना आपल्या सहप्रवाशांवर विसंबायला लागतं, तसाच या चित्रपटनिर्मितीच्या प्रवासात नव्याने उभ्या केलेल्या टीमचा आधार आपल्याला मिळाला, असं तो मानतो. हा सहकाराचा संदेश या चित्रपटाच्या कथानकात जसा आहे, तसाच तो त्याच्या निर्मितीमागेही स्पष्ट दिसतो.

**-गणेश मतकरी**

*ganesh.matkari@gmail.com*

*(प्रसिद्ध कथा-पटकथाकार)*

# कल्पकला

## मग/कपाचा बहुपयोगी होल्डर




**साहित्य-** एक कप/मग, बाजारात मिळणारे ग्लास कलर्स, ब्रश, स्केच पेन

**कृती-** मग/कप स्वच्छ धुऊन घे. तो पुसून कोरडा कर. आता त्यावर स्केच पेनने आवडेल तसे चित्र काढ. (फक्त outline काढायची आहे.) त्यानंतर ग्लास कलर्सने सावकाशपणे ते चित्र रंगव. रंग सुकल्यावर हा होल्डर वापरायला तय्यार!

**-स्वरूपा वक्नाली**

*swarupamv@gmail.com*

# बगळ्याची सवारी!




**विस्तीर्ण** पसरलेलं गवताळ कुरण... हिरव्या-पिवळ्या गवताने भरलेलं... वाऱ्यावर डोलणाऱ्या गवतामुळे सगळं कुरणच झोके घेतंय असा भास होतो... या गवतात निवांतपणे चरणारा गायी-म्हशींचा एक कळप आणि त्यांच्या पाठीवर एखाद्या शाही सवारीप्रमाणे आरूढ झालेले पांढरेशुभ्र बगळे!

कोणत्याही गावाबाहेर, शेतालगत, रानाच्या सीमेवर हमखास दिसणारं हे दृश्य! ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये तर हे दृश्य सर्रास दिसतं.

जेव्हा गायी-म्हशी कुरणात चरत असतात, तेव्हा त्यांच्या हालचालींमुळे गवतावर बसलेले कीटक त्यांची जागा सोडून बाहेर पडतात. त्यांच्या उडण्याचीच वाट हे बगळेबुवा बघत असतात. बगळ्यांना आयती मेजवानीच मिळते.

इतकंच कशाला, शेतकरी जेव्हा नांगर चालवत असतो, तेव्हाही नांगरटीमुळे जमिनीखालचे कीटक वरती येतात, ते मटकावण्यासाठी नांगराच्या मागे मागे बगळे फिरताना पाहायला मिळतात.

बगळे म्हणजे इग्रेट्स हा पक्ष्यांमधला एक मोठा समूह आहे. सर्वसाधारणपणे पाणथळ प्रदेशात, पाण्याच्या जवळ बगळ्यांचे वेगवेगळे प्रकार बघायला मिळतात. गायी-गुरांच्या बरोबर जे बगळे बघायला मिळतात, त्यांना 'कॅटल इग्रेट' म्हणजे 'गायबगळा' म्हणतात. या पक्ष्यांचं जे शास्त्रीय नाव आहे, त्यात 'बुबुलकस' असा लॅटिन भाषेतला शब्द आहे, त्याचा अर्थ गुराखी. हे बगळे म्हणजे

हिरव्यागार रानात गायी-म्हशींच्या पाठीवर बसलेले पांढरेशुभ्र बगळे हे दृश्य किती मोहक असतं. ती रंगसंगती फार छान दिसते. गायी-म्हशी आणि बगळे यांची एवढी घट्ट मैत्री कशी काय?

जणू गुरांच्या पाठीवर बसणारे गुराखी! गायबगळे पाण्यापासून दूर माळरानांवर, टेकड्यांवर, कुरणांमध्ये सहज बघायला मिळतात.

गायबगळे मूळचे आशिया आणि आफ्रिकेतले. पुढे मानवी वसाहती विस्तारत गेल्या, तसतसे बगळे सगळीकडे फैलावले. जंगलांचे तुकडे पडले, गवताळ कुरणे- शेते आक्रसली आणि बगळे ठिकठिकाणी दिसू लागले.

गायबगळ्याची चोच पिवळी असते आणि पाय पिवळसर काळे असतात. विणीच्या हंगामात या पांढऱ्याशुभ्र बगळ्यांच्या डोक्यावर, छातीवर, पाठीवर पिवळसर नारिंगी पिसांचा साज दिसायला लागतो, तेव्हा हळद लावलेल्या नवरदेवासारखे हे बगळे दिसतात. थव्याने राहणारे गायबगळे मोठ्या संख्येने एकत्र येऊन आपली घरट्यांची वसाहत उभारतात. महाराष्ट्रात जसे हे बगळे गायी-गुरांच्या पाठीवर बसलेले पाहायला मिळतात, तसे आसाममधल्या काझीरंगा अभयारण्यासारख्या ठिकाणी तिथल्या भल्यामोठ्या एकशिंगी गेंड्यांच्या पाठीवर बसून खाऊपिऊची सवारी करणारे बगळे पाहायला मिळतात. बगळ्यांची ही युक्ती काही वेळा ड्रोंगो म्हणजे कोतवाल पक्षीही वापरताना पाहायला मिळतात.

गायी-म्हशींबरोबर घट्ट मैत्री जोपासणाऱ्या बगळ्यांना या मैत्रीचा नक्की फायदा होतो. पण गुरांना काही फायदा होतो का? तर फारसा नाही. कधीकधी बगळे गुरांच्या अंगावरील रक्तपिपासू गोचिडी खातात. मात्र त्यांचे मुख्य लक्ष्य गवतावरचे कीटकच असतात. अशा प्रकारच्या नातेसंबंधाला 'कमेन्सलिझम' (Commensalism) म्हणतात.





यात एकमेकांच्या जवळ जवळ राहणाऱ्या दोनपैकी एका प्राण्यालाच फक्त फायदा होतो, दुसऱ्याला होत नाही.

असाच नातेसंबंध समुद्रतळाशी आढळणाऱ्या 'ब्रिटल स्टार' आणि 'ऑक्टोकोरल्स'मध्ये पाहायला मिळतो.

थोडक्यात काय, जर दोघांचा फायदा होत असेल तरच 'हम साथ साथ हैं', असं निसर्गात चालत नाही. आपल्यामुळे दुसऱ्याला फायदा होत असेल आणि आपलं नुकसान नसेल, तर राहू या की एकत्र, असा विचार निसर्गात होत असतोच!

**-मकरंद जोशी**
*makarandvj@gmail.com*
*(निसर्ग अभ्यासक व लेखक)*

मनोविकास

दरवेळी आपलं मन आपल्याशी काही बोलत असतं. आपल्या 'मन की बात'कडे आपण पुरेसं लक्ष देतो का?

# मन की बात!



**आज** सोहम खूपच खूश होता. त्याच्या बाबाची सगळी भावंडं त्यांच्याकडे जमल्यामुळे आज दिवसभर खूप धमाल होती. सगळे उद्याही राहणार आहेत. मस्त जेवणाचे मेन्यू, गेम - एकदम मज्जाच मज्जा. आई आणि आत्याने खूप खेळ तयार केले. आज आत्याने सगळ्यांना एक गेम सांगितला, तो सोहमला खूपच आवडला. आत्याने प्रत्येकाला एक चिठ्ठी दिली. त्यात एक घटना (सिच्युएशन) दिली होती आणि सगळ्यांना सांगितलं की, यावर तुमच्या मनात येणारे सगळेच्या सगळे विचार लिहून काढा. मनात येणारे विचार, प्रत्यक्ष काय बोलाल तेही विचार लिहायचे.

सोहमला आलेली सिच्युएशन होती की, तुला सेलफोन वापरण्यावरून बाबा सगळ्या मित्रांसमोर ओरडला! सोहमने लिहायला सुरुवात केली- 'बाबा, मला ओरडू नकोस, मित्रांसमोर तर अजिबातच ओरडायचं नाही. आई-बाबा नेहमीच असं करतात की, आपल्या मुलाचा मित्रांसमोर अपमान होतो याचं यांना काहीच वाटत नाही. यांच्या मित्रांसमोर आम्ही मात्र नीट वागायचं आणि हे आमच्या मित्रांसमोर हे असं वागणार?' सोहमला एकामागोमाग वाक्यं अगदी धडाधड सुचत होती.

आत्या पुन्हा म्हणाली की, तुमच्या मनातली सगळीच्या सगळी वाक्यं लिहा हं!

खरंतर, 'मित्रांसमोर बाबा ओरडला' -ही

सिच्युएशनच रागाशिवाय दुसरी काही वाक्यं देणारी नव्हती. त्यामुळे रागाची वाक्यंच त्याच्या मनात आली होती. पण ही प्रत्यक्ष घटना नसल्यामुळे त्याला मग काही सकारात्मक वाक्यं देखील आठवली. जसं की- 'आई-वडील हे आपल्या चांगल्यासाठीच सांगत असतात ना? हे आपले मित्रच आहेत. ते आपल्याला समजून घेतील, कारण त्यांचे आईबाबासुद्धा असंच करतात. आपल्यासमोर त्यांनासुद्धा ओरडतात कधी कधी, अशी अनेक वाक्यं सोहमच्या कागदावर उतरली. पण त्याच्या लक्षात आलं की, तरीही काही वाक्यं अजूनही मनात होती आणि काही अगदीच वेगळी म्हणजे दिलेल्या विषयापेक्षा पार वेगळी होती.

आत्ता आठवताना सोहमच्या लक्षात आलं की, आपल्या मनात खरंच किती प्रकारचे विचार येत असतात सारखे.. आपण लक्ष देत नाही, म्हणून आपल्या लक्षातच येत नाहीत.

नंतर आत्या म्हणाली की, आता तुम्ही सगळ्यांनी आपापल्या चिठ्ठीप्रमाणे विचार करा. आपण लिहिलेल्या वाक्यांपैकी कोणती वाक्यं आपण समोरच्या व्यक्तीला ऐकवू शकतो ते लिहा.

त्यावर मना काका म्हणाला, "काही वाक्यं जशीच्या तशी समोरच्याला सांगणं कठीण वाटतंय जरा!" आत्या म्हणाली, "मग त्यात काय बदल कराल ते लिहा किंवा प्रत्यक्ष अशा घटनेमध्ये तुम्ही काय कराल ते सांगा."

अक्षयदादाची घटना होती- तुमच्या गाडीला रिक्षाचा धक्का लागला तर काय कराल? त्यावर तो म्हणाला, "मी सरळ रिक्षावाल्याला ही वाक्यं सुनावू शकतो." बाबा म्हणाला, "माझी सिच्युएशन बॉसबाबत असल्यामुळे मला गप्प बसणे किंवा त्याची चूक असली तरी स्वतः सॉरी म्हणणे हाच पर्याय दिसतोय." आजोबांना सिच्युएशन होती, तुमची पत्नी सारखी तुम्हांला सूचना करते आहे.

आजोबा म्हणाले, "अशा वेळी खरंतर मी गप्पच राहतो. कदाचित कधीतरी वेगळ्या पद्धतीने तिला सांगतो! आजी उसळली आणि म्हणाली, "हो माहितीये, तुमची वेगळी पद्धत टोमणे मारण्याची." सगळे हसायला लागले."

आत्या म्हणाली, "आता मी थोडं या खेळाबद्दल सांगते, आपल्या मनात सतत विचार चालू असतात. बरेचदा आपण त्याकडे लक्ष देत नाही. पण आपण स्वतःशी जो संवाद (self talk) होतो, त्याकडे लक्ष द्यायला लागलो, तर त्या विचारांना योग्य दिशेने नेता येऊ शकते. कधी आपला talk आणि self-talk सारखाच असतो. म्हणजे जे मनात तेच ओठांवर. कधी आपला talk हा modified self-talk असतो, तर कधी self-talk काहीही असला तरी आपण no talk हा पर्याय घेतो. प्रत्येक क्षणाला आपल्या मनात अनेक विचार असतात. कधी एकाच पद्धतीने उलट-सुलट विचार येत राहतात. एखाद्या कठीण प्रसंगी विचारांचा इतका गुंता होतो की, लक्षपूर्वक self-talk समजून घेणं कठीण होतं आणि मग आपले विचार विशिष्ट विषयावर केंद्रित करता येत नाहीत. म्हणून आपण जर स्वतःचा self-talk समजून घेण्याची सवय लावून घेतली तर भावनिकदृष्ट्या गोंधळाच्या प्रसंगात आपण न गडबडता मार्ग काढू शकू."


सगळेजण अगदी छान ऐकत होते. सोहमच्या मनात काही प्रश्न होते. त्याने ठरवलं की, ते आपण आत्याला कधीही विचारू शकू. पण आत्तासाठी आपण आपला आपल्याशी संवाद (self-talk) कसा चाललाय, यावर मात्र लक्ष ठेवू. दुपारपासून सोहमला हा चाळाच लागला आणि त्याला त्याची खूप मजादेखील येत होती.

**-वैदेही भिडे**
*vaidehi.bhide@gmail.com*
*(मानसिक आरोग्य कार्यकर्ता)*



# मुलांच्या शिक्षणातही विशेष भूमिका !

**इंग्लिश** मीडियममधल्या अनेक मुलांना मराठी साहित्य वाचायला जमत नाही किंवा आवडत नाही, असा अनुभव असतो. परंतु छत्रपती शिवरायांपासून काश्मीरमधल्या दहशतवाद्यापर्यंत असंख्य भूमिका लीलया साकारणारे आणि केवळ अभिनयच नव्हे तर लेखन, दिग्दर्शन अशा विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाची छाप पाडणारे अभिनेते चिन्मय मांडलेकर हे मात्र याला अपवाद आहेत !



ते अवघे तीन- साडेतीन वर्षांचे असताना त्यांची आई गेली, पण आजी- मावश्या- मामा आणि त्यांचे वडील यांच्या मायेच्या छत्रछायेत ते मोठे होत गेले. लहानपणी ते चांगलं गाऊ शकायचे, पण कधी या मावशीकडे तर कधी स्वतःच्या घरी, असं बालपण गेल्याने एका जागी राहून गाणं शिकणं त्यांना शक्य झालं नाही. तसा आग्रहही त्यांना कोणी केला नाही. त्यामुळे गाणं शिकायचं राहून गेलं. त्यांच्या वडिलांना वाचायची प्रचंड आवड होती. विशेष करून ऐतिहासिक कादंबऱ्या वाचायची आवड होती. घरात ऐतिहासिक कादंबऱ्या आणि पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचा संग्रह होता. त्यामुळे चिन्मय मांडलेकर यांना लहानपणापासून  वाचायची आवड लागली. पु. ल. देशपांडे यांचं साहित्य त्यांनी शालेय वयातच वाचून काढलं होतं. दहावीत असताना जेव्हा सगळे पालक मुलांवर अभ्यास, परीक्षा, मार्क यासाठी दबाव आणतात, तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना विश्वास पाटील यांनी लिहिलेली सुमारे ८५० पानी 'पानिपत' ही कादंबरी आणून दिली. 'अभ्यास करता करता वर्षभरात ही कादंबरीसुद्धा वाचून काढ' असं त्यांनी सांगितलं. चिन्मय यांचा वाचनाचा झपाटा इतका होता की, ती कादंबरी त्यांनी अवघ्या तीन-साडेतीन दिवसांत वाचून काढली.

सातवी ते दहावी या काळात त्यांना पोस्टाचे स्टँप जमवण्याचाही छंद लागला होता. त्यांनी जवळपास साडेपाच हजार स्टँप्स जमवले होते. आधी गंमत म्हणून ते हे करत गेले आणि नंतर मात्र त्यांच्या लक्षात आलं की, हा फारच उद्‌बोधक छंद आहे. तो संग्रह आजही त्यांच्याकडे आहे.



भटकंतीही आपल्याला खूप काही शिकवून जाते. त्यामुळे दिल्लीला 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'मध्ये शिकत असताना त्यांनी उभा देश रेल्वेने, तोही सेकंड क्लासने पिंजून काढला आहे. यातून आपल्याला देशाची, लोकांची नस कळते, असं ते सांगतात. त्याचा उपयोग आज अभिनय करताना किंवा लेखन करताना त्यांना होत असेल, हे निश्चित!

अभिनयाच्या बाबत बोलायचं तर महाविद्यालयात असताना अभिनय क्षेत्राशी त्यांची तोंडओळख झाली. मग 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'मधून त्यांनी त्याचं विधिवत शिक्षणही घेतलं. त्यांचं कौतुक हे की, अभिनय- लेखन- दिग्दर्शनाच्या, तसंच घरच्या सगळ्या जबाबदाऱ्या अत्यंत उत्तम रीतीने पेलत असताना ते समाजसेवाही करतात.

महापालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या, अध्ययन अक्षमता असलेल्या विशेष मुलांसाठी 'मीमांसा' नावाची एक संस्था काढून त्यांना उत्तम शिक्षण मिळावं, यासाठी ते प्रयत्न करतात. त्यांची मेव्हणी पूजा ही स्पेशल एज्युकेटर आहे. अशी संस्था काढायची कल्पना तिची. या संस्थेची सुरुवात २०१४-२०१५ मध्ये झाली. ठाणे महापालिकेच्या शाळेतल्या मुलांसाठी ही संस्था काम करू लागली. आता मुंबई महापालिकेच्या शाळांतल्या विशेष मुलांसाठी सुद्धा ही संस्था काम करते. अशी मुलं शोधून काढणं, त्यांच्या समस्या सोडवणं आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे पालिका शाळेतील शिक्षकांना, विशेष मुलांना शिकवण्याचं प्रशिक्षण देणं हेही काम ही संस्था करते.


लेखन- दिग्दर्शन- अभिनय आणि घरच्या विविध जबाबदाऱ्या सांभाळून चिन्मय मांडलेकर या कामासाठी वेळ काढतात. कोणत्याही भूमिकेत असो, इतरांना आनंद देण्याचा वसा त्यांनी घेतलाय!

**-जयश्री देसाई**
*jayashreedesaii@gmail.com*
*(ज्येष्ठ लेखिका)*

## अभिनंदन!



**कोकण 'मराठी साहित्य परिषद', 'भारतीय संस्कृती प्रसारक संघ' आणि 'अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान', कल्याण यांच्यातर्फे आयोजित केलेल्या दिवाळी अंक स्पर्धेत बालसाहित्य विभागातील प्रथम पुरस्कार 'वयम्' दिवाळी अंकाला मिळाला. एक मार्चला हा पुरस्कार सोहळा बालक मंदिर संस्था सभागृह, कल्याण येथे पार पडला. यावेळी व्यासपीठावर अनेक मान्यवर उपस्थित होते. टाटा समूहाचे सल्लागार माधव जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार 'वयम्' टीममधील पल्लवी आणि विजया यांनी स्वीकारला.**



चित्र- वैष्णवी माहीमकर

# A Fan Moment

When Aarush returned home from school, he saw his grandfather, Dadu, deeply engrossed in watching an old cricket match on YouTube.

"Sachin…?"

"All the way… What a massive 175 against Australia who had set us a target of 350… Unfortunately we lost the match by 3 runs."

"Very narrow margin."

"But a great match and an even greater innings in cricketing history...!" Dadu exclaimed and returned to watching his match. He was an out-and-out Sachin Tendulkar fan.

Aarush smiled and went to his room to change.

"Maa, what's the update on Dadu's birthday?" Aarush promptly enquired after he returned. It was going to be Dadu's seventy fifth birthday four days later and members of the house had been

planning for it in hush-hush tones since the past few days. There wasn't going to be anything grand, just some close relatives and Dadu's friends were invited. But they were certainly going to make his day very special.

"Baba has already purchased the Pochampally kurta…" Baba, Aarush's father, had bought it when he was in Hyderabad for office work. Dadu had a special association with the fabric as Dadu's father, Aarush's great grandfather, had worked in a mill there.

"These are fond memories for Dadu." Aarush pondered.

"And even a pen organizer, online."

"But…"

"Baba has ordered it to his office address." Maa assured. Dadu loved pens and had quite a collection of them.

"But I loved Dadi's idea the most." Aarush commented. Dadi, Aarush's grandmother, had registered Dadu's name in a canvas painting class. Since a long time, Dadu wanted to develop this art but kept postponing it.

"With job commitments and family responsibilities, Dadu somehow lost touch with his hobby. This happens with many, though." Maa said.

"Now he can pursue it."

"Absolutely! But Dadi will have to coax him a lot!"

"He can learn online."

"There are many things that can be done 'online'. But for some, 'offline' is the best!"

"True. And you are making those seventy five diyas with… what's that?"

"Dates, khajoor… for Dadu's aarti. That's a surprise even for Dadi."

"Fantabulous!"

"What about you, kiddo? What's going to be your special gift? Last year's was so beautiful! You had painted red coloured Ganpati on a dry peepal leaf. Dadu had liked it so much!"

"I haven't yet found anything suitable." Aarush pouted, "Just wondering what would be special for him… Can you  suggest something?"

"We all have chosen ours and you will have to decide yourself! That's the plan, kiddo!"

"I know but what?" Just then, Aarush remembered, "Maa, need your consent on a form."

"Consent…?" But Aarush had already rushed to his room to collect the consent form from his school bag.

"School has selected me for an advertisement." Aarush studied

drama in school as an extra-curricular activity.

“Advertisement?”

“For an initiative-Playgrounds for everyone- taken up by some schools in our area... Our school is actively involved in it.”

“This wasn’t informed prior.”

“Principal Ma’am informed us during assembly. Even Nityaa is selected. We have to go day after tomorrow. It is a two days’ shoot and one parent can accompany. School will be sending other details.” On that note, Aarush opened Maa’s laptop to search for Dadu’s gift but couldn’t find anything again.

Two days later, Aarush reached the sets with his mother at the scheduled time. The shooting was in a society that had a small compound. There were other students from different schools. The scene was that all kids are playing cricket in a society’s compound. A batsman takes strike and hits the ball. It breaks the window pane of a random house. The owner comes out angrily to fight. At this point, the advertisement had to emphasize on the need of ‘Playground for everyone’.

The instructions were clear and kids rehearsed their parts many times with the assistants. Aarush was selected to bat. During one such rehearsal, he hit the ball really hard which promptly struck the window and the flat owner came down angrily. When a fight was to ensue, the crowd was distracted by a familiar ‘Aaila’ from behind. Everyone turned to see none other than master blaster ‘Sachin Tendulkar’ walking in with his bat!

Kids had no inkling that Sachin was going to emphasize on the initiative! It caught them completely by surprise. The cameraman immediately captured their expressions on his camera.



Obviously, the rehearsals were stalled as everyone gathered around Sachin. By then, word had spread like fire and even parents joined in to meet Sachin. There were autographs, selfies all around and Sachin happily obliged. The remaining part of the day went in rehearsing the ad with Sachin and its final take was to be shot the next day.

"Maa, I have an idea," an excited Aarush said on their way home, "Let's get Dadu for the final shoot tomorrow. He will be so happy to meet Sachin! You find out some excuse for not coming and give a note."

"Brilliant idea! It will actually be the best birthday gift for him."

"And coincidentally, Dadu and Sachin share the same birth date."

"Your Dadu always wanted to meet Sachin and this is his golden chance. His generation grew up listening to Vijay Hazare, Polly Umrigar, Vijay Merchant's matches on the radio… Legends like Kapil Dev, Sunil Gavaskar, Mohinder Amarnath were of his generation. But he simply adores Sachin Tendulkar who is so much younger."

"He's your generation player, Maa. Though he's retired, we kids still adore him. Players like Sachin are loved across generations."

"That's true. It's decided then, Dadu will come with you tomorrow."

Dadu was clueless why he was accompanying Aarush instead of Maa to the shoot. The secret was soon revealed when he saw the God of cricket walk, talk, play, even act before him. Dadu was pleasantly surprised. It was dream come true for him. After the shooting wrapped up, he sprung ahead and warmly shook hands with Sachin. He requested the master blaster for an autograph. Aarush brought out Sachin's Number 10 jersey from his bag. Dadu had purchased the jersey during 2011 World Cup Final which India had won at the Wankhede Stadium in Mumbai. Sachin happily signed it, chatted with Dadu for a while and took a selfie. Before leaving, he presented his autographed bat to Dadu which said 'Happy Birthday and best wishes for your century!'

"You had tip-toed into my room last night to get the jersey from my cupboard, right? What a special gift on my birthday eve, kiddo! The best ever…" Dadu hugged Aarush who was elated that he could finally 'gift' Dadu his 'Fan Moment'!

Disclaimer: The story is a hypothetical piece of writing and is no way linked with the reality.

**-Prachi Mokashi**
*mokashiprachi@gmail.com*








# 'आइसक्रीम क्वीन'शी गप्पा

**चवीने,** आवडीने आइसक्रीम खाणारी आकांक्षा या उद्योगात फार ठरवून आलीच नाही. २०२० मध्ये करोना काळात केवळ सात तासांच्या कार्यशाळेच्या आधारावर आणि दोन हजार रुपयांच्या भांडवलावर तिने हा उद्योग सुरू केला. B.Sc. इन 'चाइल्ड सायकॉलॉजी अॅन्ड ह्यूमन डेव्हलपमेंट' करत असताना करोना निर्बंधांमुळे बराच मोकळा वेळ तिला मिळत होता. आकांक्षाने तेव्हा वेगवेगळ्या फ्लेवर्सची आइसक्रीम्स तयार करून घरी, शेजारी द्यायला सुरुवात केली. त्याला पसंती मिळू लागली. शेजाऱ्यांनी तिला पहिली ऑर्डर दिली. इथेच तिच्या उद्योगाची सुरुवात झाली.

पुढे तीन वर्षांत, हा उद्योग खूप आवडतोय आणि हाच आपण पुढे न्यायचा, हे तिने नक्की केलं. फक्त आइसक्रीम उत्तम बनवून फायदा नाही, तर ते विकताही आलं पाहिजे, याची जाणीव होऊन तिने 'M.Sc. इन बिझनेस मॅनेजमेंट' या कोर्सला ॲडमिशन घेतली.

आइसक्रीमचा बिझनेस करायचा असेल तर तसं रीतसर शिक्षण घेणं महत्त्वाचं आहे, असं आकांक्षा सांगते. तिने स्वतः जरी सात तासांचा ऑफलाइन कोर्स केलेला असला तरी तिच्या शेफ भावाचं मार्गदर्शन घेऊन तिने आइसक्रीममध्ये आइस क्रिस्टल होणं ही समस्या सोडवली होती. नीट प्रशिक्षण घेतलं की, या अडचणी सहज सोडवता येतात असं तिचं म्हणणं आहे.

आकांक्षाच्या 'आइसक्रीममध्ये कृत्रिम रंग, फ्लेवर्स नसतात. प्रिझर्व्हेटिव्हजही नसतात. पुरणपोळी आइसक्रीम, पान आइसक्रीम, रसमलाई आइसक्रीम, कॉफी-वॉलनट आइसक्रीम, चॉकलेटचे तीन प्रकार, रेड वेलवेट, फ्रूट आइसक्रीम असे विविध प्रकार ती करते.

आकांक्षाच्या घरात वडिलांचा कार रिपेरिंगचा, तर काकांचा रियल इस्टेटचा व्यवसाय असल्यामुळे

**उन्हाळ्याची सुट्टी आणि आइस्क्रीम असं समीकरण आहे. त्यामुळे या महिन्यात क्रांतीताईने 'कुछ तो हटके'साठी युवा उद्योजिका आकांक्षा बापट हिची मुलाखत घेतली आहे. बारावी पूर्ण होताच आपल्या 'आइसक्रीम क्वीन' या ब्रँडची सुरुवात करणारी आकांक्षा फक्त २२ वर्षांची आहे. ती तिच्या उद्योगाबद्दल काय म्हणते, वाचू या!**

घरातूनही तिला बिझनेस करण्याला पूर्णपणे पाठिंबा होता. फक्त आधी तिने शिक्षण व्यवस्थित पूर्ण करावे असा घरच्यांचा आग्रह होता.

सुरुवातीच्या काळात तिने प्रदर्शनात आइसक्रीम स्टॉल लावला तेव्हा अमुक इतका खप होईल याची गणितं कधी कधी फसली; तर काही वेळा अपेक्षेपेक्षा जास्त चांगला प्रतिसाद मिळाला आणि रात्री उशिरापर्यंत जागून तिने दुसऱ्या दिवशीच्या विक्रीसाठी आइसक्रीम तयार केलं.

'आइसक्रीम क्वीन' हा ब्रँड जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आकांक्षा सोशल मीडियाचा वापर करते. प्रत्यक्षात मात्र उत्तम दर्जा आणि लोकांनी एकमेकांना ब्रँडबद्दल सांगितलेला चांगला अभिप्राय यामुळेच ब्रँड मोठा होतो, असं आकांक्षाचं म्हणणं आहे. सतत नावीन्य आणणं महत्त्वाचं असतं. 'बोबा' हा सामान्यतः पेयांमध्ये वापरला जाणारा प्रकार तिने आइसक्रीममध्ये वापरला आणि तो अतिशय लोकप्रिय झाला. सतत प्रयोग करत असताना काही वेळा प्रयोग फसतातही. पण मार्ग काढत राहावा लागतो.

कधी निराशा आली तर तू काय करतेस? आकांक्षा म्हणाली, "ते नैराश्य घालवण्यासाठी मी आइसक्रीम विकते!"

विशीच्या आत बिझनेस सुरू केलेली युवा उद्योजिका म्हणून तिचं असं सांगणं आहे की, आपली आवड काय आहे, हे ओळखा. मार्केटमध्ये कोणत्या गोष्टीची गरज आहे, ते शोधा. आपल्याला रस





असलेल्या गोष्टीतले उद्योजक कोण कोण आहेत, त्यांचा आत्तापर्यंतचा प्रवास काय आहे, त्यांची उत्पादनं कोणती- याचा अभ्यास करा. आपल्या आई-वडिलांना विश्वासात घ्या. बिझनेसला उपयुक्त असे औपचारिक शिक्षण घ्या.

आकांक्षाच्या सर्व आकांक्षा पूर्ण व्हाव्यात म्हणून 'वयम्' परिवारातर्फे तिला खूप शुभेच्छा!

ही मुलाखत प्रत्यक्ष ऐकण्यासाठी Wayam Magazine या YouTube channel ला अवश्य भेट द्या.


**-कांचन जोशी**
*kanchanpjoshi76@gmail.com*



झाडांना फुलं का येतात?
बहरलेल्या फुलांवर कीटक,
पक्षी का बसतात?
सृष्टीच्या चक्रात बहराचं
महत्त्व काय?

# गुपित फुलांच्या रंगांचं, गंधांचं!



**हिवाळा** संपून तापू लागलेल्या उन्हात तळपत असलेलं, हल्ली दुर्मिळ होत चाललेलं ते काटेसावरीचं भलंमोठं झाड. सरळसोट काटेरी फांद्या, आणि निळ्याभोर आभाळाच्या पार्श्वभूमीवर खुलून दिसणारी हाताच्या मुठीपेक्षाही मोठी किरमिजी-गुलाबी रंगाची मोठाली गोलाकार फुलं! रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना क्षणभर थबकून, मान वर करून बघायला भाग पडणारं दृश्य. वर्षभर दुर्लक्षित राहणारी काटेसावरीची झाडं. वसंतऋतूची चाहूल लागताच अंगाखांद्यांवरची पानं गाळून टाकतात, आणि निष्पर्ण फांद्यांवर तेजस्वी, आकर्षक फुलांच्या दिव्यांची रोषणाई करून झळाळून उठतात. दुरूनही नजरेत भरणारी ही बहरलेली झाडं माणसांबरोबरच अनेक प्रकारच्या किड्यांना, पाखरांना, प्राण्यांनाही आकर्षित करत असतात, आणि म्हणूनच पक्षीनिरीक्षणासाठी उत्तम ठिकाण म्हणून मानली जातात. काटेसावरीच्या मागेपुढे फुलणारी पळस अन् पांगाऱ्याची झाडंदेखील अशाच तांबड्यालाल केशरी फुलांची. किडे-कीटकांबरोबरच कित्येक जातींच्या पक्ष्यांना लुभावणारी. त्या फुललेल्या काटेसावरीखाली बसून सकाळभर माझं पक्षीनिरीक्षण चालू होतं.

मी झाडाजवळ पोचलो तेव्हा आधीपासूनच झाडावर बोटाएवढे, चिमुकले चमकदार जांभळे शिंजीर (Purple Sunbird) बागडत होते. आपल्या नाजुकशा, खाली वळलेल्या बाकदार चोचीतून केसासारखी लांब जीभ बाहेर काढून, ती फुलात खुपसून नाजूकपणे त्यांचं मध पिणं चाललं होतं. थोड्या उंचावरच्या फांद्यांवर फुललेल्या फुलांभोवती गुणगुणणाऱ्या मधमाश्या पकडण्यात राखी कोतवाल (Ashy Drongo) दंग झाला होता.

ह्या फुलावरून त्या फुलावर अशी लगबग करणाऱ्या साळुंक्या, स्थलांतर करून येणाऱ्या गुलाबी





जांभळे शिंजीर



राखी कोतवाल

पळसमैनांच्या (Rosy Pastor) आवाजात आवाज मिसळून कलकलाट करत होत्या. टोकाकडच्या फांदीवर फुलाशेजारी बैठक जमवून स्तब्ध बसलेला तांबट (Coppersmith Barbet)) किडे मटकावण्याची संधी शोधत होता. एक खारुताई पुढच्या दोन पायांनी फुलाच्या पाकळ्या पकडून, फुलात तोंड बुडवून रस पिण्यात मग्न झाली होती.

एवढ्यात पलीकडच्या झाडीतून सोनपिवळा हळद्या (Golden Oriole) उडत येऊन काटेसावरीच्या फुलांभोवतीचे कीटक टिपू लागला. त्याच्या मागोमाग लालबुड्या बुलबुलांची जोडी आली, आणि फुलांतल्या मधुरसावर अधाशासारखी तुटून पडली. पाठोपाठ कर्कश कावकाव करत एक दांडगा डोमकावळा दाखल झाला. थोडावेळ आजूबाजूला बघून धसमुसळेपणामुळे फुलांना धक्के देत मधुरस पिऊ लागला. पुढच्या तासाभराच्या अवधीत ब्राह्मणी मैना, चष्मेवाला (White Eye), वटवट्या, शिंपी, पोपट, पिवळया डोळयांचा सातभाई (Yellow Eyed Babbler) अशा आणखी सात-आठ जातींच्या पक्ष्यांनी तिथे हजेरी लावली. प्रत्येकाची मधुरसाचा आस्वाद घेण्याची पद्धत निराळी. कुणी फुलावरच बसून स्ट्रॉसारख्या लांब चोचीने हलकेच मधुरस शोषून घेतोय, तर कुणाची चोच आखूड म्हणून फुलाच्या मध्यभागी तोंड बुडवून रस पितोय. कुणी उडताउडताच पाकळ्यांच्या मधून फुलात चोच खुपसतोय, तर कुणी चक्क फूल उलटे करून चोचीत मधुरसाची धार ओतून घेतोय. एक मात्र नक्की की, तिथे मटकवायला कितीही मधमाशा, कीटक असले, तरी त्या मोठाल्या पेल्यासारख्या फुलांत भरलेल्या मधुरसाचा मोह कुणालाच सोडवत नव्हता. किंबहुना, त्या गोड मधुरसासाठीच दूरवरून उडून येऊन हे सारे पक्षीगण फुललेल्या काटेसावरीवर हजेरी लावत होते.

ऊन चढल्यावर घरी परतत असताना वाटेत





भरभरून फुललेला 'नीलमोहोर' म्हणजे 'जॅकरांडा' दिसला. मूळचं ब्राझिलचं असणारं हे झाड आपल्याकडच्या कोरड्या हवामानाच्या सपाट प्रदेशात छान वाढतं, मनमुराद फुलतं. याच्या शांतशीतल, निळसर जांभळ्या, करंगळीएवढ्या नळीसारख्या फुलांच्या गुच्छांचं सौंदर्य काही आगळंच. मात्र ह्या फुलांवर पक्षी काही दिसत नाहीत. तसंच गुलमोहोराचंसुद्धा आहे! इतकी सुंदर फुलं असूनदेखील ह्या फुलांच्या वाटेला का बरे जात नसावेत पक्षी? याचं कारण म्हणजे ही सुंदर दिसणारी फुलं पक्ष्यांसाठी नसतातच मुळी! तुम्ही म्हणाल असं कसं बरं? मग पक्ष्यांसाठीची फुलं असतात तरी कोणती आणि कशी? याचं उत्तर मिळवायचं तर आधी 'झाडाला फुलं का येतात?' ह्या प्रश्नापासून सुरुवात करावी लागेल.

निसर्गातले पशू, पक्षी, कीटक, जीवाणू, वनस्पती- साऱ्या जीवांचं आयुष्यभरासाठीचं एकच मुख्य ध्येय असतं, ते म्हणजे पुनरुत्पादन! म्हणजे स्वतःसारखा नवीन जीव, नवीन पिढी तयार करणं. यासाठीच बहुसंख्य वनस्पतींमध्ये निसर्गाने फुलांची निर्मिती केली आहे. फुलापासून नवीन बीज तयार होण्यासाठी फुलामध्ये परागीभवन (Pollination) होणं जरूर असतं, हे आपण जाणतोच. फुलामधील स्त्री-केसरावर पुंकेसरामधून निघणारे परागकण जाऊन पडणं म्हणजे परागीभवन. यात आणखी एक गोम आहे, ती म्हणजे नवीन पिढी निरोगी, शक्तिमान, ठणठणीत निर्माण होण्यासाठी फुलांना स्वतःचं नव्हे, तर दुसऱ्या फुलात निर्माण झालेले परागकण मिळणं आवश्यक असतं. हे काही सहज होणारं काम नाही. त्यासाठी झाडांना कुणा ना कुणाची तरी मदत घ्यावी लागते. वारा, पाणी, पक्षी, कीटक, प्राणी हे यासाठीचे प्रमुख 'एजंट्स! आता जर तुम्ही आजूबाजूच्या फुलांकडे नीट बघितलंत, तर त्यांचे विविध आकार, रंग, वास, फुलण्याच्या वेळा या साऱ्यांवरून त्यांचं परागीभवन कसं होत असेल याचा थोडा अंदाज घेता येईल.

साधारणतः रात्री उमलणारी फुलं पांढरी अन् सुवासिक असतात. रात्री उडणाऱ्या कीटकांना आकर्षित करण्यासाठी ही आयडिया. दिवसा उडणाऱ्या कीटकांसाठीच्या फुलांचा रंग बहुतांशी पिवळा, जांभळा, गुलाबी असतो, कारण दिवसाच्या प्रकाशातील अतिनील किरणांमध्ये (Ultra Violet rays) बऱ्याच कीटकांना ती दूरवर आकर्षून घेतात. विशेष म्हणजे ह्यांपैकी बऱ्याच फुलांच्या पाकळ्यांवर मार्गदर्शक ठिपके, रेषाही असतात. याला विविध प्रकारच्या सुवासांची जोड मिळते आणि फुलांचा माग काढत कीटक तिथवर पोहोचतात. आता हे कीटक परागकण वाहून नेण्याचं काम फुकटात

करतील का? मग त्यांना बक्षीस म्हणून परागकणच दिले जाऊ लागले. पण ह्या सौद्यामध्ये असंख्य परागकण वाया जाऊ लागले. एवढे परागकण तयार करणं झाडांना परवडेना, म्हणून मग त्यातल्या काही हुशार झाडांनी डोकं चालवलं. एवढे महागमोलाचे भाराभर पराग तयार करण्यात शक्ती वाया घालवण्याऐवजी त्यांनी सरळ कीटकांना कटाप करून टाकलं. परागकणांची संख्या कमी करून वाचवलेल्या शक्तीला फुलांकडे वळवलं. फुलांना जास्त सुंदर, भडक, आकर्षक रूप दिलं आणि कीटकांऐवजी पक्ष्यांवर लक्ष केंद्रित केलं.

अशा दिखाऊ, मोठाल्या फुलांकडे पक्षी आकर्षित होऊ लागले, पण ते वारंवार यावेत, त्यांनी जास्तीत जास्त परागकण दूरवर न्यावेत, यासाठी काहीतरी नवीन,'हटके' करणं भाग होतं. तुम्ही नाही का वह्यापुस्तकांबरोबर गिफ्ट म्हणून कव्हर्स, लेबल्स देणाऱ्या दुकानात पुन्हा पुन्हा जात? तर पक्ष्यांना मोहवण्यासाठी परागकणांऐवजी थेट गोड गोड मधुररसाची निर्मिती सुरू झाली. पक्षी डोळ्यांसमोर ठेवून उत्क्रांत होत गेलेल्या फुलांनी हळूहळू सुगंध निर्माण करणंही थांबवलं, कारण पक्ष्यांना सुगंधाचं फारसं ज्ञान नसतं. म्हणून तर काटेसावर, पळस, पांगारा, ह्या झाडाच्या फुलांना अजिबात सुवास नसतो! फांद्यांवरची फुलांची रचनादेखील 'बर्ड-फ्रेंडली' झाली. पक्ष्यांचं वजन पेलवेल, त्यांचा धसमुसळेपणा सहन करून झाडावर टिकून राहतील अशा कणखर देठांची, करकरीत, चिवट पाकळ्यांची फुलं तयार झाली. गोड रस तयार करणाऱ्या ग्रंथींना पाकळ्यांच्या तळाशी लपवलं गेलं, आणि त्यांच्या वरच्या भागात स्त्रीकेसर-पुंकेसराची मांडणी केली गेली. म्हणजे तळातल्या रसाकडे पोहोचताना चोच किंवा डोकं हमखास पुंकेसर-स्त्रीकेसराला स्पर्श करणारच! अशा प्रकारे मधुरस पिऊन चिकट



झालेल्या चोचींवर, कपाळावर, कधी पंजांवर परागकण चिकटून पक्ष्यांबरोबर ते आपसूक दुसऱ्या झाडांवरच्या फुलांवर जाऊन पोहोचू लागले.

झाडांनी योजलेल्या युक्त्यांना, केलेल्या प्रयत्नांना पक्ष्यांद्वारे गोमटी फळे येऊ लागली. हे सारं खूप सावकाश, हजारो वर्षांच्या कालावधीत घडून आलं. दरवर्षी मार्च-एप्रिलमध्ये सृष्टीतली बहुतेक झाडं बहरत असताना, त्यांच्या बहरांचा आनंद लुटताना, त्यांच्यावर येणारे पक्षी निरखताना त्यामागच्या झाडांच्या परिश्रमांची, कष्टांची आठवण ठेवली पाहिजे. आसपास दिसणाऱ्या फुलांचा आकार, रंग, वास, रचना जशी दिसते, तशी ती का आहे असे प्रश्न पडायला हवेत, त्यांची उत्तरं मिळवण्यासाठी विचार करायला हवा. डोकं खाजवायला हवं. अशाने मग सृष्टीत दडलेलं एक एक आश्चर्य हलकेच उलगडू लागेल, एकेका प्रश्नाची उत्तरं आपसूक मिळू लागतील, नुसत्या निरीक्षणाला वैज्ञानिक दृष्टिकोनाची साथ मिळेल, आणि आपण केलेल्या खटाटोपाला कुणीतरी दाद देत आहे, ह्या आनंदात वृक्षही अधिक जोमाने बहरू लागतील.

**–डॉ. श्रीश क्षीरसागर**
*kshirsagarshreesh@gmail.com*
*(वैद्यकतज्ज्ञ आणि निसर्गतज्ज्ञ)*

# वसंत ऋतू फोटोग्राफी स्पर्धा

‘वयम्’च्या वाचकांनो, ही स्पर्धा आहे खास पालक आणि मुलांसाठी. यामध्ये पालक आणि मुलांनी मिळून सहभागी व्हायचं आहे. तुम्हांला यात काय करायचं आहे? त्यासाठी हे पूर्ण पान नीट वाचा. सध्या आपल्या सभोवताली पाहिलं की, आता वसंत ऋतू जाणवू लागलाय. निसर्ग बहरलाय. सृष्टीचं लोभस रूप दिसू लागलंय. तुमच्या आसपास तुम्हांला वसंत ऋतूचं जे चित्र दिसतंय, त्याचे दोन फोटो कॅमेऱ्यातून टिपायचे आहेत आणि त्या दोन फोटोंना साजेशी फोटोओळही द्यायची आहे. खाली दिलेल्या इमेल आयडीवर फोटोओळींसहित हे फोटो पाठवायचे आहेत.



## स्पर्धेचे नियम-

१. ही स्पर्धा आहे खास पालक आणि मुलांसाठी.

२. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी १०० रुपये प्रवेश फी आहे.
फी भरण्यासाठी बाजूला **QR** कोड दिला आहे त्यावर पैसे भरा आणि फोटो पाठवताना पेमेंट केलेल्याचा स्क्रीनशॉटही मेलमध्ये **Attach** करून पाठवा.

scan here to pay

३. फोटो पाठवण्यासाठीचा इमेल- **ahamawamwayam@gmail.com**

४. फोटो **JPEG** फॉरमॅटमध्ये असावेत. फोटो ब्लर नसावेत.

५. वसंत ऋतूतील निसर्गाचे दोन फोटो आणि त्यासाठी दिलेल्या फोटोओळी असतील तरच फोटो ग्राह्य धरले जातील. **Whats up** वरून पाठवलेले फोटो स्पर्धेसाठी स्वीकारले जाणार नाहीत.

६. या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस दिले जाईल. तसेच विजेत्यांचे फोटो अंकातून आणि सोशल मिडियाद्वारे प्रसिद्ध केले जातील.

७. फोटो आणि फोटोओळ पाठवण्याची अंतिम तारीख ३० एप्रिल आहे.

८. फोटो मेल करतेवेळी तुमचा मोबाइल नंबर, तुमचे आणि तुमच्या मुलाचे नाव, इयत्ता, शाळा आठवणीने लिहा.

# रंगतरंग

पेटीत होते रंगांचे खडू
'मीच छान' म्हणत लागले भांडू

लाल म्हणाला
मी टोमॅटो, मी चेरी,
माझाच फ्रॉक दिसतो भारी
रस्त्यात जर उभा राहीन,
सगळ्या गाड्या
क्षणात थांबवीन...

हिरवा म्हणाला
मी गवत, मी झाड
सगळीकडे मीच वेली किंवा माड
कुणाची अडवणूक
मी ना करतो
भरभर गाड्या पुढे सोडतो...

पिवळा म्हणे
मी हळद, मी डाळी
आरोग्यासाठी खा
माझ्याच रंगाची केळी,
तुम्ही जेव्हा करता
सारखी अदलाबदल
मी सांगतो लोकांना
सावध व्हा पळभर...
तिकडून आले गुरुजी


कसले रे भांडता
इंद्रधनुष्यात कसे रे
एकत्र नांदता...

पिवळ्या, घे हाती लालूचा हात
केशरी रंगाची होईल बरसात,
हिरव्याला जेव्हा आलिंगन देशील
जांभळा रंग तूच खुलवशील,
थोडा काळा.. होशील विटकरी
किती छटा दिसतील भारी...

लालोबा, तुझा रुसवा सोड
पांढऱ्यात मिसळ, हो गुलाबी गोड,
जरा हो काळा, चॉकलेटी दिसशील
बालगोपालांच्या मनात बसशील...

सगळे आता प्रयोगशाळेत जाऊ
एकीचं बळ प्रत्यक्ष पाहू.
एका गोलावर बसा रांगेत
मी गरगर फिरवतो
जसा पाळणा जत्रेत.
आता विचारा कोणाला
दिसतो कुठला रंग,
वेगवेगळे नाही कुणी
फक्त पांढरा तरंग
फक्त पांढरा तरंग...

**-डॉ. हर्षदा प्रसाद देवधर**
*drharshadadeodhar@gmail.com*





वर दिलेली दोन्ही चित्रं नीट बघ.
त्या दोन्ही चित्रांत पाच फरक दडले आहेत. शोध बघू.

–अथर्व आगरकर
*Atharv.Agarkar@wayam.in*

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

अहम् आवाम्
# वयम्
आपणा सारे

न्यू वंदना को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, ३रा मजला,
लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
'वयम्' मोबाइल : ९१३७१२८९१५
इमेल : info@wayam.in
वेबसाइट : www.wayam.in



## सभासद नोंदणी फॉर्म

**१ वर्ष**
**₹ ११००/-**
डिलिव्हरी चार्जेससहित

**१० + १ दिवाळी अंक**

scan here to pay

नोंदणी क्रमांक : .................... दिनांक : ....................

नाव : ....................

पत्ता : ....................

.................... पिन कोड : ....................

जवळची खूण : ....................

फोन : .................... इमेल : ....................

जन्मतारीख : .................... इयत्ता : ....................

शाळा : ....................

वर्गणी जमा केल्याचा तपशील

चेक नं. : .................... बँक व बँक शाखा : ....................

चेक दिनांक : .................... रुपये : ....................

'वयम्'च्या ऑनलाइन सबस्क्रिप्शनसाठी माहिती-

Labindia Analytical Instruments Pvt. Ltd. Axis Bank, Thane | CC A/C No.: 911030017556004 | IFSC : UTIB0000061

चेक / डिमांड ड्राफ्ट : लॅबइंडिया ॲनॅलिटीकल इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि.
(Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.) या नावाने काढावा.

सही : ....................

*'वयम्' मासिकाचे वर्गणीदार झाल्याबद्दल धन्यवाद!*


Vidu विदु
VIDU ELECTRIC BICYCLES
PROJECT BY :LABINDIA EQUIPMENTS PVT. LTD.
ELECTRIC BICYCLES
POWERING THE POLLUTION
FREE ENVIRONMENT
COMING SOON
A CYCLE FOR EVERY INDIAN..
For More Details- 9152152001
FOLLOW US AT
WWW. LABINDIAVIDU.COM
GO GREEN...
GO ELECTRIC
MAKE IN INDIA

RNI NO.MAHMUL/2013/53138 POSTAL Reg. No.THC/85/2023-2025 Post at Thane Head Post Office- 400601, Published on 1st of every month and posted on 5th of every month

# Help these kids find their way home...



